बुधवार, 05 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 62
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 05 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-62 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


# पत्रकारांकडे चारित्र्य प्रमाणपत्राची मागणी

## पंतप्रधान मोदींचा हिमाचल प्रदेश दौरा : विरोधानंतर नोटीस मागे


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी हिमाचल प्रदेशचा दौरा करणार आहेत. या दौऱ्याचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना प्रशासनाने चारित्र्य प्रमाणपत्र सादर करण्याची नोटीस बजावली होती. प्रशासनावर याबाबत संताप व्यक्त करण्यात आल्यानंतर ही नोटीस मागे घेण्यात आली आहे. २९ सप्टेंबरला बजावलेल्या या नोटीसमध्ये पत्रकार, फोटोग्राफर आणि व्हिडीओग्राफर्सला चारित्र्य प्रमाणपत्र सादर करण्यास सांगण्यात आले होते. 'दूरदर्शन' आणि 'ऑल इंडिया रेडिओ'च्या कर्मचाऱ्यांनाही हे प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले होते.**



या प्रकरणात नवी अधिसूचना जारी करत बिलासपूरच्या पोलीस अधीक्षकांनी घडल्या प्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. ही नोटीस कार्यालयाकडून अनावधानाने जारी करण्यात आली आहे. ही नोटीस आम्ही मागे घेत आहोत, असे पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी माध्यम कर्मचाऱ्यांचे स्वागत असून त्यांना सुविधा उपलब्ध केल्या जातील, असेही पोलीस अधीक्षकांनी म्हटले आहे. नव्या अधिसूचनेनुसार सरकारच्या माध्यम विभागाने शिफारस केलेल्या कर्मचाऱ्यांना पास दिला जाणार आहे.

चारित्र्य प्रमाणपत्र सादर करण्याच्या प्रशासनाच्या निर्णयावर पत्रकारांकडून सडकून टीका करण्यात आली होती. पंतप्रधानांच्या बिलासपूर येथील सभेचे वार्तांकन करण्यासाठी चारित्र्य प्रमाणपत्र सादर करण्यास सांगण्यात आले आहे. हे सर्वांवर बंधनकारक करण्यात आले आहे. प्रशासनाकडून आता अधिकृत ओळखपत्रांवरदेखील संशय घेतला जात आहे, अशा आशयाचे ट्वीट पत्रकार मंजीत सेहगल यांनी केले होते. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रमाणपत्राच्या मागणीवर ज्येष्ठ पत्रकार मृणाल पांडे यांनीही नाराजी व्यक्त केली होती.



19

No. Sec/Function/22- 17522

From
Superintendent of Police,
Bilaspur, District Bilaspur(HP)

To
The District Public Relation Officer,
Bilaspur, District Bilaspur (HP)
Dated: 29/09/22

Subject: **Regarding to provide list of all press correspondents, photographers and videographers, team of Doordarshan Kendra and AIR along with a certificate of their character verification.**

Sir,

The Hon'ble PM of India is visiting this on 05/10/2022 district at AIIMS and Luhnu Ground and will address a public meeting at Luhnu.

In this regard, it is requested that that list of all press correspondents, photographers, videographers, team of Doordarshan Kendra and AIR along with a certificate of their character verification may be supplied to the office of the **Dy. Superintendent of Police CID Bilaspur by 01/10/2022 positively**. Their access within the rally or meeting will be decided by this office.

Yours faithfully,

**Devakar Sharma IPS,**
Superintendent of Police,
District Bilaspur (HP)
Dated-

Endst. No. Sec/Function/22-
Copy to:

1. The Deputy Commissioner, Bilaspur district Bilaspur (HP) for favour of information and necessary action.

Superintendent of Police,
District Bilaspur (HP)

## चर्चेतली बातमी

# अनिल देशमुखांना जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना आज मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ईडीने दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. हा जामीन मंजूर झाला असला तरी त्यांची तुरुंगातून सुटका होणार नाही. कारण सीबीआयकडूनही त्यांच्यावर वेगळा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यावर निर्णय होणे बाकी आहे. मनी लॉँड्रिंग आणि 100 कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात ईडीने आणि सीबीआयने अनिल देशमुख यांच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल केले होते. त्यामध्ये ईडीच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने अनिल देशमुखांना जामीन मंजूर केला आहे. अनिल देशमुख यांच्या वतीने अनेकदा न्यायालयात जामीनासाठी अर्ज करण्यात आला होता. पण प्रत्येकवेळी तो नाकारण्यात आला. आता तब्बल 11 महिन्यानंतर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. अनिल देशमुखांनी व्यावसायिकांकडून अवैधरित्या वसूलीसाठी पोलिसांवर दबाव टाकला. आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदली प्रक्रियेतही त्यांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप ईडीच्यावतीने करण्यात आला होता. तर परमबीर सिंह आणि सचिन वाझेनं केलेल्या आरोपांबाबत कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही, एखादा मेसेज, व्हॉट्स ॲप संभाषण, व्हिडीओ रेकॉर्डिंगसारखे कोणतेही पुरावे तपास यंत्रणेकडे नाहीत.

# तीन शास्त्रज्ञांना नोबेल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सोमवापासून २०२२ या वर्षातील नोबेल पुरस्कारांची घोषणा सुरू झाली आहे. स्वीडनच्या स्वांते पाबो यांना वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पारितोषिक जाहीर झाल्यानंतर आज भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ॲलेन ॲस्पेक्ट, जॉन एफ क्लॉजर आणि अँटोन झेलिंगर यांना एकमेकांमध्ये अडकलेल्या फोटॉन संदर्भातील अभ्यासासाठी यंदाचा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. अलेन आस्पेक्ट हे फ्रान्सचे मधील स्वेले विद्यापीठांमध्ये प्राध्यापक आहेत. तर जॉन एफ क्लॉजर हे अमेरिकेतील शास्त्रज्ञ आणि अँटोन झेलिंगर हे ऑस्ट्रियातील व्हिएन्ना विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत.

# उत्तराखंडमध्ये हिमस्खलन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे मोठी दुर्घटना घडली आहे. द्रौपदी का डांडा-२ शिखराजवळ झालेल्या हिमस्खलनामुळे १० जणांचा मृत्यू झाला आहे. १८ जण अद्यापही बेपत्ता असून बचावकार्य सुरु आहे. हे सर्वजण उत्तरकाशीच्या नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंगच्या ट्रेकिंग ग्रुपचा भाग होते. यामध्ये ३३ प्रशिक्षणार्थी आणि सात प्रशिक्षकांचा समावेश होता. घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं घटनास्थळी बचावकार्यासाठी रवाना झाली. भारतीय हवाई दलाने बचावकार्यासाठी दोन चिता हेलिकॉप्टर्स तैनात केले आहेत. जिल्हा प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ, भारतीय लष्कर आणि आयटीबीपी अधिकारी सध्या बचावकार्यात सहभागी आहेत. मुख्यमंत्री धामी यांनी ट्वीट करत दिलेल्या माहितीनुसार हिमस्सखलन झाल्याने नेहरु माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटचे प्रशिक्षणार्थी अडकले आहेत. मी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे लष्कराच्या मदतीने वेगाने बचावकार्य करण्यासाठी विनंती केली आहे. त्यांनी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जाईल असं आश्वासन दिलं आहे. सर्वांना सुरक्षित बाहेर काढण्याचा प्रयत्न आहे.



# राज्य सरकारची दिवाळी भेट

## रेशनकार्डधारकांना १०० रुपयांत आवश्यक असणाऱ्या वस्तू



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्रासह देशात सणासुदीचा हंगाम सुरू झाला आहे. दिवाळी सणही अगदी तोंडावर आला आहे. करोना संसर्गानंतर पहिल्यांदाच निर्बंधमुक्त दिवाळी होणार आहे. पण करोना काळात नोकऱ्या गेल्याने अद्याप अनेकांना आर्थिक अडचणींतून सावरता आले नाही. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.**

राज्यातील रेशनकार्डधारकांना १०० रुपयांत दिवाळी सणासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू देण्यात येणार आहेत. आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पॅकेजबाबतची माहिती प्रसारमाध्यमांना दिली. राज्यातील रेशनकार्डधारकांना १०० रुपयांत दिवाळी सणासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू देण्यात येणार आहेत. शरद पवारांनी दोन वाक्यात विषयच संपवला; म्हणाले दिवाळीच्या निमित्ताने राज्यातील शिधापत्रिकाधारकांना केवळ १०० रुपयांत शिधा वस्तूंचे दिवाळी पॅकेज देण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संचामध्ये प्रत्येक शिधापत्रिकाधारकांना रवा, चणाडाळ, साखर प्रत्येकी एक किलो आणि एक लिटर पामतेल यांचा समावेश असेल. राज्यातील १ कोटी ७० लाख कुटुंबांना म्हणजेच सुमारे सात कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे. हा संच एक महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येऊन त्याचे वितरण ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ४८६ कोटी ९४ लाख खर्चासदेखील मान्यता देण्यात आली. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या इतरही निर्णयांची माहिती दिली. पोलिसांसाठी देण्यात येणारी हाऊसिंग लोन योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे राज्यातील पोलिसांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय भंडारा जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनेला मान्यता देण्यात आली आहे. तसेच मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यासाठी कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प सुधारणेला मान्यता दिली आहे. याचा मराठवाड्यातील ८ दुष्काळी तालुक्यांना फायदा होणार आहे, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.




आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार




- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## महिलांचा आंदोलनातील सहभाग

आधुनिक केसरी

**एक लढा असाही (भाग-6)**

कारण ही समस्या येथील लोकांच्या जीवनमरणाशी निगडित आहे. त्यामुळे यावर उत्तर शोधताना डोंगरउतारावरील न पिकणाऱ्या शेतीकडून वनशेतीकडे वळावे लागेल. किंवा जंगल आणि शेती अशा मिश्र पद्धतीचा अवलंब करावा लागेल. पर्यावरणाचे प्रश्न सोडवताना सामाजिक संदर्भाचा विचार करावा लागेल. आपल्याकडे बेसुमार वाढणारी लोकसंख्या आणि त्या मानाने कमी होत जाणारे उत्पन्नाचे स्रोत, मर्यादित साधनसामुग्री ही जशी समस्या आहे तशीच मूठभर लोकांच्या हाती केंद्रित झालेली संपत्ती, जमीन हे देखील एक महत्वाचे कारण आहे. जोपर्यंत ही असमानता दूर होत नाही, तोपर्यंत स्थानिक गोरगरीब लोकांचे आपल्या उपजीविकेसाठी जंगलांवर आक्रमण सुरूच राहणार. या समस्येवर विचार करून दीर्घकालीन उपाय योजायला हवेत.

चिपको आंदोलनांची ही कहाणी केवळ हिमालय किंवा हिमाचल प्रदेशापुरती मर्यादित आहे का ? आपल्याला असे वाटत असेल तर आपल्या भोवतालची परिस्थिती आपण डोळे उघडून पाहिली पाहिजे. महाराष्ट्रासारख्या अनेक राज्यातील जंगले झपाट्याने कमी होताहेत. त्यामानाने जी झाडे लावली जात आहेत ती तुटपुंजी आहेत. पुण्यामुंबईसारख्या शहरांचा अफाट लोकसंख्येमुळे जो विस्तार होतो आहे, तो होताना तेथील पर्यावरण, जंगल यांची बेसुमार हानी होते आहे. अनेक ठिकाणचे डोंगर भूमाफियांनी नष्ट केले आहे. डोंगर उतारावरील झाडे तोडून तेथे गगनचुंबी इमारती बिल्डरांनी उभ्या केल्या आहेत. निसर्ग, प्राणी, पक्षी यांची संरक्षक साखळी तुटते आहे. नद्यांमधील वाळू संपत चालली आहे. नद्या, समुद्रावर आक्रमण करून त्यांना मागे हटवून बांधकामे केली जात आहे. सांडपाणी, कारखान्यांचे दूषित पाणी यामुळे पाण्याचे स्रोत प्रदूषित होत आहेत. कार्बन उत्सर्जन, हरित गृह वायूंचे वातावरणातील प्रमाण वाढल्याने पृथ्वीचे तापमान ( ग्लोबल वार्मिंग ) वाढते आहे. रासायनिक पदार्थांच्या अतिवापरामुळे कॅन्सर सारख्या घातक रोगांचे प्रमाण वाढते आहे. प्रदूषण हा खूप मोठा आणि व्यापक विषय आहे. यावर खूप काही लिहिण्यासारखे आणि बोलण्यासारखे आहे. आज आपल्यासाठी ही धोक्याची घंटा आहे. याकडे वेळीच लक्ष दिले नाही तर आपलेच जीवन धोक्यात येईल.

गावोगावी काही तरुण आणि निसर्गप्रेमी मंडळी त्यांच्या परीने वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे. मध्यंतरी काही तरुण मुलामुलींनी एकत्र येऊन प्लॅस्टिकने प्रदूषित झालेले समुद्रकिनारे स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. हे सगळे प्रयत्न आशादायी आहेत पण ही चळवळ अजूनही खूप व्यापक प्रमाणात उभी राहायला हवी. समाजातील सरकारसह सगळ्या घटकांनी या प्रश्नावर हातात हात घालून काम करण्याची गरज आहे. आता आपल्याला ' एक लढा असाही ' देण्याची गरज आहे.



## आनंदी पहाट

### सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ

आधुनिक केसरी

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते. आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनाने सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातले सार सामावलेले असते.

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.



आधुनिक केसरी

### तुम्हावीन सांगा | कोण वाली ||

आरूषाची बोली | कौतुक मातेसी ||
त्याचे आणिकासी | काय घेणे ||१||

तैसे माझे बोल | जाण तू विठ्ठला ||
नको बोलबाला | क्लेशदायी ||२||

मानपान सारा | व्यवहार लटका ||
भक्तीत नेटका | लीन भाव ||३||

देखता चरण | आता सुखावलो ||
बालक मी झालो | अजाणता ||४||

माय बाप गोत | तुम्ही पांडुरंगा ||
तुम्हावीन सांगा | कोण वाली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं सकलैश्वर्यदायिनि।**
**भुक्तिमुक्तिप्रदायिन्यै श्रीरूपिणि नमो नमः।। ३६ ।।**
सकल ऐश्वर्य प्रदान करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. हे श्रीरूपिणी, भुक्ती-मुक्ती-प्रदायिनी, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं रेणुराजसुते नमः।**
**भक्तकामप्रदे देवि नमो नमो नमो नमः।। ३७ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. रेणुराजाच्या सुते, तुला नमस्कार असो. भक्तांच्या कामना फलद्रूप करणारे देवी, तुला त्रिवार नमस्कार असो.

## जोडीदार

आधुनिक केसरी

देवाला पण मानलं पाहिजे. तो माणसांच्या जोड्या पण विलक्षण बनवतो. एकसुरी आयुष्य खूप कंटाळवाण होईल हे त्याला माहित असतं म्हणून तो मित्रांच्या, प्रेमाच्या अगदी नवरा बायकोच्याही जोड्या बनवताना दोन अशा व्यक्तीमत्वांना एकत्रित आणतो की जे एकमेकांशी छान जुळवून घेतील. अबोल व्यक्तीला बोलकी व्यक्ती देतो, गंभीर व्यक्तीला आनंदी व्यक्ती देतो, भांडखोर व्यक्तीला शांत व्यक्ती देतो आणि खडूस लोकांना थोडीशी मोकळी आणि जास्त समजूतदार व्यक्ती मिळते, ज्या योगे त्यांचही कुठे अडणार नाही. खरं तर, दोन व्यक्तीमध्ये फरक हा असणारच. परंतु हा जो फरक आहे तो ओळखून तुम्ही कसे निभावता हे जास्त महत्वाचं असतं. कधी कधी आपण हतबल होतो. कारण समोरच्या व्यक्तीला कसं सांभाळून घ्यायचं हे आपल्याला कळत नाही. पण कोण चुकतं, त्यापेक्षा काय चुकतं, हे एकदा कळलं की उत्तरं सोपी होतात. अनेकदा आपला दुषित दृष्टीकोन हाच एक मोठा अडथळा असतो. आपण जसे आहोत तशी समोरची व्यक्ती नसेल, तर आपला अपेक्षाभंग ठरलेला असतो. पण आपणही समोरच्या अपेक्षांमध्ये उतरतो का हा एक विचार करण्यासारखा विषय आहे. वेगळेपण आहे म्हणून नात्यांमध्ये सौंदर्य आहे. सगळेच सारखे असतील तर आयुष्य किती कंटाळवाणे, नीरस होईल ? उदास व्यक्तीच्या सोबत उदास माणूस कसं वाटतं? प्रत्येकाने आयुष्याचा आनंद पुरेपूर घ्यावा, एकटं राहू नये ह्यासाठी मैत्री, जोडीदार, सहचर अशा गोष्टी उदयास आल्या. पण आपण मात्र आपल्या व्यक्तीवर टीका करण्यात इतके मशगुल होतो की त्यांच्या वेगळेपणातील सौंदर्य बघण्याची तसदी कधी घेत नाही. आपलं माणूस थोडसं वेडगळ आहे, वेगळं आहे पण गोड आणि प्रिय आहे असा विचार करायला सुरवात केली की त्याचं वेगळेपण सहज आपल्यामध्ये सामाऊन जात. 'अनुरुप' शब्दाचा अर्थ हा कधीच एकसारखे असा होत नाही नं ? एकमेकांना अनुरुप म्हणजेच जिथे एक कमी तिथे त्याची कमतरता दुसरा भरुन काढतो. कधी गुणांनी, कधी स्वभावाने, कधी विचारांनी. म्हणूनच विविधतेत एकता असते. ह्या वेगळेपणातूनच एक सुंदर, संवेदनशील आणि मोहक नातं निर्माण होतं जे आपल्याला जपते. आणि ज्याला जीवापाड जपण्यासाठी आपण धडपडतो.

## विजया दशमी : श्री तिरुपती बालाजी

आधुनिक केसरी

**जागर दर्शन आठवणीचा**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

मराठवाड्यातील अनेक जण तिरुपतीला श्रीबालाजी दर्शनासाठी नित्यनेमाने जातात, पर्वकाळात श्री व्यंकटेशचरणी सेवाकार्य करणारे सेवेकरी म्हणून तिरुपतीला रहातात.

कुलदेवी म्हणून रेणुकामाता, तुळजामाता, आणि कुलदेवता म्हणून, पाहुणा म्हणून देवांच्या पूजेत "बालाजी" "व्यंकटेश" असतात. माझ्याही परिवारात कुलाचार म्हणून श्री रेणुकामाता आणि श्री बालाजी यांची पूजा केली जाते.

मित्र हो, माझ्या जन्मापासूनच्या म्हणजे १९५१ या वर्षापासून मी श्री बालाजीच्या कृपाछायेखाली वावरत असलेला भाग्यवान आहे. १९५० ते १९५९ या काळात मध्ये माझे वडीलविठ्ठल हनुमंत देशपांडे, हैद्राबाद बॅंकेतले व्ही. एच. देशपांडे "बाप्पा" ही त्यांची ओळख. परभणी जिल्ह्यातील मानवत या गावी हेड कॅशियर म्हणून कार्यरत होते. त्याकाळी बॅंकेतील स्टाफ म्हणजे व्यापारी वर्गासाठी खूप महत्वाचा. सहाजिकच गावात मोठा मानसन्मान असायचा. त्याकाळच्या पद्धतीप्रमाणे बदली होणाऱ्या नोकरदारांना मोठ्या वाड्यात मोठी जागा किरायाने प्राधान्याने मिळे. त्या जुन्याकाळातत "भाडेकरु" असे म्हणत नसत. तर किराया ( भाडे ) देऊन राहणारे ते "किरायेदार", अशा उर्दु शब्दांचा वापर मराठवाड्यात सहज होत असे.

आम्ही राहायचो तो वाडा काटकर परिवाराचा होता आणि या वाड्यातच श्री बालाजी मंदिर होते. मानवत नामांकित मोठ्या बाजारपेठेचे गाव. दर शुक्रवारी बालाजी दर्शनाला व्यापारी मंडळी मोठ्या संख्येने येत. प्रसाद म्हणून आणलेले पेढे आणि फुटाणे ते मुक्त हस्ते वाटायचे. माझ्या वयाच्या आठव्या वर्षापर्यंत आम्ही



मानवत या गावी होतो. तेव्हाच्या दिवसात प्रसादाचे पेढे इतके मिळायचे की आमच्या घरातले पितळेचे डबे (स्टीलची भांडी नव्हती) कायम पेढ्यांनी भरलेले असायचे. माझे आजोबा-वडिलांचे बाबा, आईची आई- आजी, बाहेरगावाहून आली की बालाजी मंदिराच्या मंडपात भजन-पोथी वाचन करायचे.

साठ वर्षांपूर्वीचे माझ्या लहानपणीचे दिवस या वाड्यातील अंगणात, मंदिराच्या ओवरीतल्या लाकडी खांबांना धरून लपाछपी खेळण्यात, श्रीबालाजीच्या नजरेखाली बागडले ही आठवण पुन्हा एकदा लहान बनवते.

"व्यंकट रमणा गोविंदा, लक्ष्मी रमणा गोविंदा" असा जयघोष करीत आठ घंटे लाईनीत उभे राहून दर्शन घेण्याचा योग आला तो १९६५-७० च्या दरम्यान. पहिल्यांदा सहकुटुंब, सहपरिवार तिरुपती बालाजीयात्रा झाली. असे आठवते. मंदिराच्यापरिसरात असलेल्या धर्मशाळेत राहण्याची सोय होती. बालाजीला अभिषेक -प्रसाद करणे याला "गंगाळ करणे" असे म्हणतात. पन्नास-पंचावन्न वर्षापूर्वीचा प्रसाद मोठी बुट्टी-बांबूची टोकरी भरून शुध्द तुपातले चित्रान्न आणि मोठ्या चेंडू एव्हढे साजूक तुपातले बुंदीचे लाडू पंचीवीस माणसांना पुरे होईल इतका प्रसाद दिला जायचा. चित्रान्न -भरलेली बुट्टी खांद्यावर घेत खोलीवर येईपर्यंत साजूक तुपातमी न्हाऊन निघालो. चालतांना उन्हात प्रसाद वितळून गेला होता. आमची सगळ्यात अलीकडच्या काळात घडलेली तिरुपती ट्रीप- २००३ च्या आसपास झाली. तेव्हा सर्व आधुनिक सोयीची ही दर्शन -यात्रामजेत झाली.

नवरात्र म्हणजे देवी अंबाबाईचे, मी गंगाखेड या गावी असतांना तिथे असलेल्या बालाजी मंदिरात बालाजीचे नवरात्र साजरे करण्याचा योग १९८२ ते १९८५ असे सलग तीन वर्ष लाभला. गोदाकाठी असलेल्या या मंदिरातील श्रीबालाजी मूर्ती डोळा भरून पहावी असेच वाटते. या मंदिरात दुसर्या एका खोलीत बालाजीचे बंधू गोविंदराज यांची निद्रावस्थेत पहुडलेली खूप मोठीमूर्ती आहे.

पुढे परभणीला आलो गावातील सुभाष रोडवरील बालाजी मंदिरात जाणे होई. पुढच्या काळात कारेगाव रोडला आमच्या श्रीराम नगर कॉलोनी जवळचअसलेल्या व्यंकटेश नगरमध्ये नवे श्री व्यंकटेश मंदिर झाले, अगदी तिरुपती बालाजीच जणू परभणीत आमच्यासाठी अवतरला खूप सुंदर मंदिर आहे हे. इथे पुन्हा आमचे कुलाचार श्री बालाजी चरणी सुरु राहिले.

वाशीम इथे श्री बालाजी मंदिर, देऊळगाव राजा येथील श्री बालाजीया दोन्ही ठिकाणी दर्शन घेण्याचे प्रवास योग आले. पाच सात वर्षापूर्वी हैद्राबाद येथील काचीगुडा हायस्कूलमध्ये १९६७ साली एचएससी पास झालेल्या आम्हा वर्गमित्रांचा मेळावा झाला, त्यासाठी माजी विद्यार्थी म्हणून मी गेलो होतो. पन्नास वर्षानंतर पुन्हा एकदा अनेकजण भेटलो. त्यावेळी लोकल ट्रीपचा भाग म्हणून आम्हाला अत्याधुनिक बालाजीचे दर्शन घेण्याचा योग आला त्याचे नाव "व्हिसा -बालाजी", "डॉलर -बालाजी" असे रूढ झाले आहे.

आम्ही गेलो त्यावेळी हजारभर संख्येने तरी आय टी झालेली नवी पिढी परदेसी जाण्यासाठी लागणारा व्हिसा मिळावा म्हणून नवसबोलण्यासाठी आलेली होती आणि बालाजी नवसाला पावला. व्हिसा मिळाला म्हणून काही जण नवस फेडायला आलेले होते. पुण्यात आल्यापासून श्री नारायणपूरला दत्त दर्शन आणि जवळच्या केकतजवळा येथील -व्यंकटेश मंदिर -बालाजी दर्शन घेण्यास जाणे होत असते.

मित्र हो ..देवी दर्शन आणि आजचे श्री बालाजी दर्शन आठवणींचा जागर "कसा वाटला ? अभिप्राय जरूर द्यावेत. आपणा सर्वांना दसरा-विजयादशमीच्या शुभेच्छा.

# आष्टी-मुंबई रेल्वेसेवेसाठी खा. प्रीतमताई मुंडे यांची रेल्वेमंत्र्यांशी भेट

## अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत रेल्वे विभागाला दिल्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** नगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील नगर ते आष्टी हा साठ किमीचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर आष्टी रेल्वेस्थानकावर नगर-आष्टी डेमु रेल्वे सेवेची सुरुवात करण्यात आली आहे. या मार्गावरील रेल्वेसेवेचा विस्तार करून आष्टी ते मुंबई पर्यंत प्रवासी रेल्वे सुरू करण्यात यावी अशी पुनःश्च मागणी खा. डॉ.प्रितम मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खा.डॉ. प्रितम मुंडे यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यासाठी रेल्वेची सेवा मुंबई पर्यंत सुरू होणे जेवढे फायदेशीर आहे. तेवढेच रेल्वे विभागासाठी देखील फलदायी ठरणार आहे. बीडकरांच्या हिताचा आणि रेल्वेच्या फायद्याचा सारासार विचार करून आष्टीपासून मुंबई पर्यंत प्रवासी रेल्वेवाहतूक सुरू करण्यात यावी. रेल्वे हा बीड जिल्ह्यातील प्रत्येकासाठी जिव्हाळ्याचा विषय आहे अशी मागणी खा.डॉ. प्रितम मुंडे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. खा.डॉ.प्रितम मुंडे यांच्या मागणीला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन तात्काळ तोडगा काढण्याच्या सूचना रेल्वे विभागाला दिल्या आहेत. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी रेल्वेची भूमिका महत्वाची असल्यामुळे आपण याबाबत सकारात्मक आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड ही यावेळी उपस्थित होते.



# मतदारसंघातील निराधारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार

## जनसहयोगमध्ये जागतिक वृध्द तज्ञ दिनानिमित्त आ. मुंदडांचे प्रतिपादन




आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तहसील कार्यालयांतर्गत निराधारांच्या ज्या समस्या आहेत, त्या लवकरच मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही आ. नमिता मुंदडा यांनी रविवारी येथे मानवलोक येथे दिली. येथील मानवलोक जनसहयोगमध्ये जागतिक वृध्ददिन व महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आ. मुंदडा बोलत होत्या. याप्रसंगी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड, पत्रकार दिलीप आरसुळ, वैजनाथ देशमुख, अनंत आरसुडे, नाना गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया, कल्पना लोहिया यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती. आ. मुंदडा म्हणाल्या की, घरातील ज्येष्ठ स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून, कुटूंबातील इतर सदस्यांची जास्त काळजी घेतात. त्यामुळे वृध्दांनी स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. त्यासाठी लोखंडीसावरगावच्या वृध्दत्व निवारण केंद्रात आरोग्य तपासणीचे शिबिर सुरू आहे. तिथे तपासणी करण्याचे आवाहनही यावेळी आ. मुंदडांनी केले. मानवलोक जनसहयोगने निराधारांच्या समस्याबाबत हक्काने प्रश्न मांडावेत त्यासाठी आपण तत्पर असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. मानवलोकने गरजवंतांना निर्धास्तपणे समाजाचे प्रश्न सोडवण्याची ताकद कै. डॉ. द्वारकादास लोहिया यांनी निर्माण केली. मानवलोकने समाजाला व निराधारांना भावनिक आधार देत जगण्याचे बळ दिले. त्यामुळे या जनसहयोगच्या माध्यमातून निराधार व वृद्ध संघटीत झाले. जे सुशिक्षित आहेत, तेच आपल्या आई वडिलांना विसरतात. अशांनी नैतिकता गमावल्याची खंतही यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा यांनी व्यक्त केली. त्यांना शासनाने उत्पन्नाचे प्रमाणपत्र दाखल करण्याची अट घातली आहे. यासाठी त्यांना पुन्हा तहसील कार्यालयात व तलाठ्याकडे चकरा मारण्याची वेळ येणार आहे. हा त्रास वाचवण्यासाठी उत्पन्नाची अट रद्द करावी. महागाईच्या जमान्यात निराधारांना एक हजाराचे मानधन तुटपुंजे आहे. त्यामुळे यात वाढ करून ते दरमहा ३ हजार करावे. समितीची बैठक दर ३ महिन्याला असते. मात्र वर्षे उलटले तरीही बैठक होत नाही. त्यामुळे निराधारांचे प्रश्न प्रलंबित आहेत. निराधारांचे अनुदानही वेळेवर येत नाही, ज्यांचे ज्या बँकेत खाते आहे. तिथे त्याच्या खात्यावर मानधन यावे अशा विविध समस्या कल्पना लोहिया यांनीही मांडल्या. याप्रसंगी अनिकेत लोहिया, मिलिंद गायकवाड यांचीही भाषणे झाली. सूत्रसंचालन श्याम सरवदे यांनी केले. संजना आपेट व सावित्री सगरे, दिलीप मारवाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी आ.नमिता मुंदडांच्या हस्ते आसरडोहकर, प्रा. संभाजी सावळकर यांच्यासह निराधारांचा सत्कार करण्यात आला. सतीश कांबळे, संतोष राठोड यांनी कार्यक्रम चांगल्याप्रकारे पार पडावा म्हणून पुढाकार घेतला.

# अबब... पिंपळगाव-दिवशीला जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा

## छाप्यात 25 लाख रुपये रोख तर एक कोटी ऐंशी लाखाचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील दिवशी पिंपळगाव शिवारातील कसाबखेडा फाटा ते देवगाव रोडवरील दगडा यांच्या फॉर्म हाऊसवर आज पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखा व शिल्लेगाव पोलिसांनी संयुक्त कारवाई केली यामध्ये अनेक मोठे मासे जुगार खेळताना आढळून आले असून त्यांच्याकडून पोलिसांनी चक्क 25 लाख रुपये रोख रोकड जप्त केली असून एक कोटी 82 लाखांचा मुद्देमाल जप्त केली असल्याची माहिती शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यानी आधुनिक केसरीच्या प्रतिनिधिशी बोलताना दिली.

दरम्यान या कारवाईतील मुद्देमालात सगळे हीव्हीआयपी लोकांच्या फॉरचुनर व इतर लकझरी चारचाकी गाड्या आयफोन, पोलिसांनी जप्त केल्या असून आत्तापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचे समजते यामध्ये पुनमसिंग सुनील ठाकूर (वय 33 वर्ष रा.राजनगाव)राहुल सुरेश परदेशी (वय 33 वर्ष रा.पदमपुरा, औरंगाबाद गणेश रावसाहेब पोटे (वय 28 वर्ष राहणार नागेश्वर वाडी औरंगाबाद)अभिषेक वसंत कुमार जैन (वय 38 वर्ष रा.वर्धमान नगर जालना)कुणाल दिलीप कुमारजी बाकलीवाल (रा.शहागंज औरंगाबाद) संदीप सुधाकर लिंगायत (वय 37 वर्ष रा.चेलीपुरा औरंगाबाद) मनोज कुमार फुलचंद दगडा (वय ४६ रा. N९ सिडको औरंगाबाद) असे झन्ना/मन्ना खेळणाऱ्या इस्माची नावे आहेत.

सदरची कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक पवन बन्सोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे, शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांच्यासह पोलीस उमेश गुडे, अर्जुन तायडे, दादाराव तिडके,भावे,कीर्तिकर,पथकाने केली पोलिसांच्या सर्वच स्तरातुन अभिनंदन होत आहे.






# खा. डॉ. प्रीतम मुंडे यांच्या नेतृत्वात दसरा मेळाव्यासाठी निघणार अभूतपूर्व रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**परळी :** गोपीनाथगड ते भगवान भक्तीगड रॅलीतून दिसणार भक्ती आणि शक्तीचे भव्य-दिव्य स्वरूप कर्मयोगी राष्ट्रसंत ह.भ.प.परमपुज्य भगवानबाबा यांची जन्मभूमी भगवान भक्तीगड, सावरगाव घाट येथे भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा माजीमंत्री पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वात होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी गोपीनाथगड येथून अभूतपूर्व दसरा मेळावा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. बीडच्या खा. डॉ.प्रितम गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वात



रॅली निघणार-होणार असून मोठ्या संख्येने मुंडे प्रेमींचा सहभाग रॅलीत असणार आहे. गोपीनाथगडावरुन स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन होणार रॅलीची सुरुवात बुधवारी सकाळी सहा वाजता लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन रॅलीला सुरुवात होणार असून दरवर्षीप्रमाणे यंदाही गोपीनाथगड, सिरसाळा, दिंद्रुड, तेलगाव, वडवणी, घाटसावळी, बीड, वंजारवाडी मार्गे नायगाव, तांबवा राजुरी, चुंबळी फाटा, वांजरा फाटा, कुसळंब भगवान भक्तीगड सावरगाव घाट अशी रॅली निघणार आहे. खा.डॉ.प्रितम मुंडे यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या रॅलीच्या माध्यमातून गोपीनाथगडाच्या भक्तीचे आणि भगवानबाबांच्या शक्तीचे भव्य-दिव्य स्वरूप याचि देही याचि डोळा...! अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने लोकांचा सहभाग रॅलीत असणार आहे.

# भूपेंद्र पटेलच का?

आधुनिक केसरी

गुजरात विधानसभेच्या निवडणुका या वर्षी डिसेंबरमध्ये पार पडणार आहे. त्यादृष्टीने सर्व पक्ष कामाला लागले आहेत. भाजपाही या निवडणुकीच्या तयारीनिशी मैदानात उतरली आहे. भाजपापुढे काँग्रेस आणि आम आदमी पक्षाचे आव्हान असणार आहे. त्यात, आता गुजरात भाजपा प्रदेशाध्यक्ष सीआर पाटील यांनी केलेल्या विधानामुळे चर्चांना उधाण आले आहे. एका कार्यक्रमात बोलताना सीआर पाटील यांनी सांगितले की, भाजपा सत्तेवर आल्यास भूपेंद्र पटेल मुख्यमंत्रीपदी कायम राहतील. तसेच, आगामी निवडणुकीच्या तिकीट वाटपाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह निर्णय घेतील. मी सर्व उमेदवारांची माहिती त्यांच्याकडे दिली आहे, असेही पाटील यांनी स्पष्ट केले. गेल्या वर्षी विजय रुपाणी यांच्याजागी भूपेंद्र पटेल यांना मुख्यमंत्री करण्यात आले. १३ सप्टेंबर २०२१ साली मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेले भूपेंद्र पटेल वादविवाद आणि माध्यमांच्या प्रसिद्धीपासून लांब आहेत. जे भाजपाच्या फायद्याचे आहे. अहमदाबामधील घाटलोडिया येथून पहिल्यांदा आमदार झाल्यापासून ते मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापर्यंत त्यांनी चांगले काम केले आहे. मात्र, निवडणुका जवळ आल्याने भाजपाला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा सातत्याने बदलणे त्यांच्या पथ्यावर पडू शकते. रुपाणी यांची हकालपट्टी करणे पक्षासाठी सोपे होते. मात्र, पटेल यांच्यारूपाने भाजपा राज्यातील सत्तेला स्थिरता देण्याचा प्रयत्न करत आहे. भूपेंद्र पटेलांच्या नेतृत्वाखाली भाजपाने गांधीनगर महापालिका आणि सुमारे ९००० हजार ग्रामपंचायत निवडणुकीत दमदार कामगिरी केली. गांधीनगर महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजपाने ४४ पैकी ४१ जागांवर आपला पाय रोवला. तर, राज्यातील ७० टक्के अधिक ग्रामपंचायतीवर भाजपाचा झेंडा फडकवला आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्ष भाजपाला आव्हान देत आहे. त्यासाठी भूपेंद्र पटेल यांच्या पाठीशी मोदी-शाह यांची जोडगोळी असेल. सौराष्ट्रमधील एका पाटीदार भाजपा नेत्याने म्हटले की, निवडणुकीत काय होईल, याबाबत कोणाला माहिती नाही. मात्र, राज्यात पाटीदार आरक्षणाच्या प्रश्नावर कोणतेही आंदोलन करण्यात आले नाही. तसेच, अन्य जातीचे लोकही आनंदी आहेत. प्रत्येकाला राज्यात सामजिक सलोखा हवा आहे. गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार होऊन एक वर्ष झाल्यानंतर विजय रुपानी यांनी काही दिवसांपूर्वी मोठा खुलासा केला आहे. भाजपा हायकमांडने आदल्या रात्रीच आपल्याला राजीनामा देण्यास सांगितले होते, अशी माहिती त्यांनी दिलेल्या मुलाखतीत दिली आहे. मला आदल्या रात्री त्यांनी सांगितले आणि दुसऱ्या दिवशी मी राजीनामा सुपूर्द केला, असे ते म्हणाले. विजय रुपानी यांनी ११ सप्टेंबर २०२१ ला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. मी त्यांना कारणही विचारले नाही, त्यामुळे त्यांनीही सांगितले नाही. मी विचारले असते तर त्यांनी नक्कीच सांगितले असते. पण मी नेहमीच एक शिस्तबद्ध कार्यकर्ता राहिलो आहे. पक्षाने मला जे काही सांगितले ते मी नेहमीच केले आहे. पक्षानेच मला मुख्यमंत्री केले होते. पक्षाने मला आता नवे मुख्यमंत्री येणार असल्याचे सांगितले आणि मी आनंदाने तयार झालो, असे विजय रुपानी म्हणाले.

# धर्मांतराची घोषणा आणि तत्कालीन पडसाद !



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवले मुक्तामी धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा केली. ज्यामुळे भारतासह संपूर्ण जगामध्ये वैचारिक भूकंपाची त्सुनामी येऊन अनेक धर्ममार्तंड, धर्म प्रचार-प्रसारक तथा धर्माच्या ठेकेदारांनी आपापली वैचारिक, प्रामाणिक तथा अप्रामाणिक भूमिका विशद करायला सुरुवात केली. कित्येकांनी आपल्या रणनीतीचे आखाडे सज्ज करून सावज टिपण्यासाठी फासे मांडले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणेला कधी नव्हे एवढे महत्त्व प्राप्त होऊन त्याचे आंतरराष्ट्रीय पडसाद उमटले.**

त्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सन १९३२ लाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे (स्पर्श करण्यास अयोग्य समाज) एकमेव आणि सच्चे पुढारी असल्याचे सिद्ध झाले होते. गोलमेज परिषदांमध्ये त्यांनी अगाध ज्ञानाच्या जोरावर मांडलेली प्रगल्भ वैचारिक भूमिका त्यांचे वाकचातुर्य, हजरजबाबीपणा, संभाषण कौशल्य तथा सत्यनिष्ठता या सर्वांमुळे त्यांना गांधीजींचा जीवापाड विरोध असूनही इंग्रजांना त्यांना डावलता आले नाही. गांधीजी व त्यांचामधील वागयुद्ध, वैचारिक विरोध हे संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी अनुभवून ते सर्व त्यांच्या पचनी पडलं होतं. परंतु धर्मांतराची घोषणा कुणाला अजीर्ण झाली तर कुणाच्या उशी जाऊन तो घाव त्यांच्या वर्मी बसला. कोणी कोणी तर आपापल्या धर्मवाढीच्या सुखद स्वप्नांसह सत्तेच्या विमानी बैसून अस्मान भरारी घेण्यात मग्न झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतराची ही घोषणा अधिकृत असली तरी त्यांच्या मनी धर्मांतराचे विचार घोळत नव्हते असे अजिबात नाही. समाजव्यवस्थेचे अवलोकन तथा विश्लेषणांती त्यांच्या अनेक गोष्टी लक्षात आल्या होत्या. त्यांनी इथल्या विषमतावादी व्यवस्थेला महाड चवदार तळ्याचा व सहा वर्षे चाललेल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या माध्यमातून मनुष्यत्वाला आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक हक्क अधिकारांची मागणी केली होती. परंतु जातीयवादी कोती मानसिकता ते देण्यास असमर्थ असल्याचे त्यांना जाणवले. सोबतच त्यांच्या हेही लक्षात आले, की एखाद्या अस्पृश्याने धर्मांतर करून ख्रिस्ती अथवा मुस्लिम धर्म स्वीकारला असता त्याच्यासोबत ते समतेचा व्यवहार करतात. अशी स्वधर्मियांसोबत दोगली, भेदजन्य वागणूक व परधर्मीयांना समानतेची वागणूक हेही त्यांच्या बुद्धिवादाला नेहमी खटकत होतं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ ला धर्मांतरासंबंधी बार्शी येथे आपली भूमिका विशद करताना म्हटले की, "ज्या धर्मात माणसाला माणुसकी नाही तो धर्म काय कामाचा? जो धर्म त्याच्या अनुयायांना ऐहिक आणि परलौकिक सुखाची द्वारे मोकळी न करता ती बंद करूनच अधोगतीत खितपत पडावयास लावतो, त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे? उलट धर्मांतर केल्याबरोबर जर तेच लोक आपली मोजदाद माणसात करून आपल्याला समानतेने वागवतात तर धर्मांतर का करू नये हे मला कळत नाही. माझी खात्री आहे की असा आपण धर्म त्यात केला तर जे हिंदू लोक आपला तिरस्कार करतात तेच आपल्याला मान देतील.

धर्मांतर संबंधीची आणखी बरीच मोठी मांडणी त्यांनी एप्रिल १९२७ मध्ये सुरू झालेल्या बहिष्कृत भारत या पक्षिकात केलेली दिसून येते. परंतु जेव्हा बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव येथील ५००० महारांनी ब्राह्मणेत्तर संघटना व काही हिंदू संघटनांना धर्मांतराची नोटीस दिली तेव्हा त्यांना सल्ला देताना २९ मे १९२९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "धर्मान्तराशिवाय अस्पृश्यता नष्ट करण्याचा मार्ग कठीण आहे. त्या मार्गाने जाण्यास जो सोशिकपणा पाहिजे तो ज्याच्या अंगी नसेल त्यांनी धर्मांतर करण्याच्या विरुद्ध मी नाही."

अशा एक ना अनेक कारणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतराची भूमिका विश्लेषित करून निर्णय घेणे भाग पडले. परंतु निर्णय घेताच अनेक व्यक्ती, पक्ष, संघटना, पुढारी, धर्म प्रचारक तथा वृत्तपत्रांनी त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करून त्यांना भंडावून सोडले. एवढेच नव्हे तर त्यांचे नेतृत्व मान्य करून त्यांच्याच सोबत काम करणाऱ्यांनी धर्मांतर भूमिके विरोधात दंड थोपटले. परंतु अभ्यासांती त्यांचा विरोध मावळला. काही आंबेडकर विरोधी अस्पृश्य पुढारी सुद्धा जीवानिशी विरोध करताना दिसले. परंतु ते केसरी कंपुचे प्रायोजकत्व असल्याचे सिद्ध झाले. शेवटी त्यांनीही समर्थनच



नव्हे तर कृतिशील पाठिंबा दर्शविला. हजारो लोकांच्या उपस्थितीमध्ये सभा-संमेलने घेऊन तन-मन-धनाने समर्थन करत अस्पृश्य वारकऱ्यांनी गळ्यातील माळांची होळी केली. काहींनी घरातील देवी-देवतांचे मूर्तीभंजन केले. एवढेच नव्हे तर अनेकांनी जातीयतेचे किंवा विषमतावादाचे समर्थन करणाऱ्या धर्मग्रंथांना अग्नीस्वाहा केले. कारण तसे ठराव येवला परिषदेमध्ये पास झालेले होते. त्यामध्ये स्पृश्य वर्गाच्या मतपरिवर्तनासाठी प्रयत्न न करता त्यांच्यापासून वेगळे होने. सत्याग्रह स्थगित करणे. समता स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी धर्म परिवर्तन करणे. तसेच धर्मांतराच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून ब्राह्मणी देवी देवतांची पूजा, त्यांचे सण, व मंदिर प्रवेश न करण्याचे सर्वानुमते ठरले.

याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे शेकडो पत्रांचा सुद्धा वर्षाव होत होता. त्यामध्ये समर्थनात नगण्य तर विरोधातील बहुसंख्य भरमार होता. एका सिंधी बांधवाने त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. विद्वान पंडित सातवडेकर यांनी पुरुषार्थ मासिकातून त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. पुण्यातील एका सभेत शिष्यस्वामी शंकराचार्य (जेरीशास्त्री) यांनी धर्मग्रंथांचा उल्लेख करत चांडाळ योनी ही श्वान व सुकर योनीपेक्षाही नीच आहे. असे म्हणत आपल्याच बुद्धीचे वाभाडे काढले. निर्भीड मासिकासह दै. सकाळ, दै. नवाकाळ, दै. केसरी इत्यादींनी सुद्धा आपली विरोधाभाशी विचार फवारणी केली. त्यांचा सर्वांगीण समाचार घेण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले बंद पडलेले जनता पत्र सुरू होताच न विसरता केले.

हे सर्व घडत असताना विश्वभरातील विविध धर्माचे प्रचार-प्रसारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे मोठ्या आशेने पाहत होते. ते त्यांची भेट घेऊन त्यांना सभा संमेलनांची आमंत्रणे देऊ लागले. कोणी त्यांना धर्मसंस्थापकाचा अवतार मानून, अस्पृश्यांना समतेने वागवण्याची, त्यांच्यासोबत रोटीबेटी व्यवहार करण्याचे आश्वासन देत होते. त्यांच्या उद्धारासाठी आंतरराष्ट्रीय फंडाची तरतूद करायला सुद्धा त्यांनी सुरुवात केली होती. या सर्वांची दखल घेत उच्चवर्णीय पुरोगामी तथा प्रतिगामी लोकांमधून साधक-बाधक प्रतिक्रिया येऊ लागल्या. विषमतावाद्यांच्या मते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने आमच्या धर्माचे काहीही बिघडणार नाही. उलट हिंदू धर्मातील घाणच कमी होईल. असे विषारी फुत्कार ते सोडू लागले. तर काही पुरोगामी लोकांना त्याचे दुरगामी परिणाम दिसू लागले. त्यामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मनधरणी करायला सुरुवात करुन अस्पृश्यता निवारणाचे कार्य आरंभिले. कारण त्यांना माहीत होते की, अस्पृश्यांनी धर्मांतर करून जर ते ख्रिस्ती किंवा मुस्लिम झाले तर स्वधर्माला उतरती कळाला लागून तो शिल्लकच राहणार नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही पक्की जाणीव होती, की यामागे त्यांची न्यायाची अथवा मानवतेची चळवळ नसून ती स्वधर्मरक्षणार्थ केलेली वळवळ आहे. म्हणून त्यांनी १५ फेब्रुवारी १९३६ ला जनता पत्रात 'उडदामाजी काळे गोरे' हा अग्रलेख लिहून सर्वांनाच खडे बोल सुनावले.

आजही भारतातील विविध राज्यांमध्ये संविधानाचा तथा कायद्याचा बडगा असूनही श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच तथा जातीयवादाची भावना जोपासून मागासवर्गीयांवर अनन्वित अत्याचार केले जातात. त्यामागे दुसरे तिसरे काहीही नसून त्यांच्या मनामध्ये तेवत असणारी जातीश्रेष्ठत्वाची भावनाच असते. या सर्वांची कारणमीमांसा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या (Annihilation of cast) जातीप्रथेचे निर्मूलन या पुस्तकात म्हणतात की, "जातीयत्वाच्या भावना ज्या-ज्या धर्मग्रंथावर आधारित आहेत त्यांनाच मुठमाती दिली पाहिजे." तर दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, "समाज व्यवस्थापनासाठी नीती आणि कायदा या दोघांचीही गरज असते." आज घडिला हे दोन्ही तत्व भारतीय संविधानामध्ये निहीत आहेत. त्यांच्याप्रती भारतीय समाजात जागृतता व ते अति विकसित होऊन पूर्णत्वास जावो हीच अपेक्षा!

# विजयादशमी : दृष्टप्रवृत्तीचा नाश करून मिळणारा विजय



रमेश लांजेवार
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय, अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय, अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्रास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करून रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे. तेव्हाच भारतात सर्वधर्मसमभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीत सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे "विजयादशमी" साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे.**

लंकापती रावन हे महान राजनितिज्ञ व पराक्रमी राजा होते म्हणूनच त्यांना लंकापती रावण संबोधले जायचे. परंतु त्यांच्यात काही दृष्ट व वाईट प्रवृत्ती होत्या. त्यांनी माता सितेचे हरण करून राक्षसीप्रवृतीचा आगास केला. हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता आणि येथुनच लंकापती रावण पराभूत होण्याला सुरूवात झाली.यानंतर रावणाने पूर्णपणे अधर्माचा मार्ग अवलंबला. अधर्माचा मार्ग सोडण्यासाठी देवी-देवता, आप्त-नातेवाईक, राजनैतिज्ञ गुरूसह अनेकांनी प्रयत्न केले. परंतु संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले व सितेला हस्तगत करण्याच्या जीद्दीने रावणाने आपल्याच संपूर्ण कुळाला युध्दाच्या खाईत लोटले व लंकापती रावण यांच्या सर्वनाशाची आकाशवाणी झाली. हळूहळू संपूर्ण मोठ-मोठे बलाढ्य शुरविर धाराशाही झाले. यात मुख्यत्वेकरून मेघनाथ, कुंभकर्णासारखे महाबलशाली यांनाही रावणाने मृत्यूच्या खाईत लोटले. त्याच प्रवृत्तीचा नाश करण्यासाठीच प्रभुश्रीरामचंद्र हे धरतीवर अवतरले व रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा रामानी वध केला. विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय, अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय, अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्रास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करून रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे. तेव्हाच भारतात सर्वधर्मसमभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीत सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे "विजयादशमी". साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे. घटस्थापनेपासून दसऱ्यापर्यत संपूर्ण भारतात उत्साहाचे व मांगल्याचे वातावरण आपल्याला पहायला मिळते व याच दिवसापासून दिवाळीचा शंखनाद संपूर्ण भारतात गुंजतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची 9 दिवस आराधना केल्यानंतर दशमीला म्हणजेच विजयादशमीला दसरा उत्सव मोठ्या थाटात साजता केला जातो. हा दीवस म्हणजे असुरीशक्तीचा नाश व सत्याचा विजय मानले जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा संहार करुण असुरीशक्तीला संपवून मानवतेचे रक्षण केले. त्या निमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. याच दीवशी माँ जगदंबेने अनेक राक्षसाचा वध करूण विजय प्राप्त केला. त्याचप्रमाणे पांडव अज्ञातवासात असताना पांडवांनी सोन्याच्या (आपटयाच्या) झाडावर लपविलेली शस्त्रे याच दीवशी काढण्यात आली व याच दीवशी रामाने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा वध करुन विजय प्राप्त केल्याच्या अनेक कथांमध्ये व पुराणांमध्ये आपल्याला पहायला मिळतात. त्याच अनुशंगाने विजयादशमीला आपट्याच्या पाणाला तीतकेच अतुट महत्व आहे. आपट्याचे पान एकमेकांना देवून आनंदोत्सव साजरा करतात व लहान-मोठ्यांना शुभेच्छा व आर्शिवाद देतात. त्याचप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी सर्वसामान्य व शेतकरी आपल्या उपयोगात येणाऱ्या संपूर्ण शस्त्रांची (साहित्याची) पुजा करताना फुलांसोबत सोन्याच्या (अहपड्याच्या) पाणांनी पुजा अर्चना केली जाते. यावरुन आपण समजू शकतो की, आपट्याच्या पानाला विजयादशमीच्या दिवशी किती महत्त्व आहे.



गेली 2 वर्षे करोना महामारीने भारतासह संपूर्ण जगाला जखडले होते. त्यामूळे संपुर्ण सण, उत्सव, खेळ यावर संकट आले की काय असे वाटत होते व संपूर्ण सण उत्सवासह व इतरही कार्यक्रम खोळंबले. परंतु आता करोना महामारी संपुष्टात आल्याने तब्बल 2 वर्षानंतर रावण दहणाचा कार्यकम संपूर्ण भारतात साजरा होत आहे. देशात वाढते प्रदुषण पहाता विजयादशमीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्ष लागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शिलंगणाचे सोने



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**दसऱ्याच्या दिवशी रामाने रावणाचा वध केला होता. म्हणूनच एखाद्या चांगल्या गोष्टीची सुरुवात करताना आणि वाईट गोष्टीचा शेवट करण्यासाठी आपण या दिवसाची वाट पाहत असतो. म्हणूनच दसऱ्याला विजयादशमी असंही म्हणतात. हा दिवस म्हणजे विजय मिळवलेला दिवस. या दिवशीच अनेक जण नवीन कार्याची सुरुवात करतात. दसऱ्याला कोणतीही चांगली सुरुवात करायला हवी संकल्प करायला हवे.**

हिंदू संस्कृतीत खूप महत्व असलेला व मोठा सण दसरा. आश्विन शुद्ध दशमीला येतो. आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून नऊ दिवस नवरात्र असते.देवीची शक्तीची उपासना केली जाते. त्यांनंतरचा दहावा दिवस म्हणजेच 'दसरा', ह्याच सणाला विजयादशमी असेही आपण म्हणतो.

'दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा', साधू संत येती घरा,तोची दिवाळी दसरा... या काव्यातच ह्या सणाची महती गौरवलेली आहे. दसरा हा पराक्रमाचा, पौरुषाचा सण आहे. या दिवशी सरस्वतीपूजन तसेच शस्त्रपूजनही केले जाते.

दसरा या सणाची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. याच दिवशी देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला. प्रभू रामचंद्र याच दिवशी रावणावर स्वारी करायला निघाले. पांडव अज्ञातवासात राहण्याकरिता ज्या वेळी विराटच्या घरी गेले, त्या वेळी त्यांनी आपली शस्त्रे शमीच्या झाडात लपवून ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी तेथील शस्त्रे परत घेतली व त्या झाडाची पूजा केली, तो हाच दिवस.शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्ल्यावर भवानी देवीच्या उत्सवाला याच दिवशी सुरुवात केली. पेशवेकाळात ही या सणाचे महत्व मोठे होते. बाजीराव पेशवे याच दिवशी पुढच्या स्वारीचे बेत आखत. अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राजावर स्वारी करण्यास जात असत. त्याला सीमोल्लंघन म्हणत. दसरा म्हणजेच विजयादशमी हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. विजयादशमी म्हणजे हमखास विजय मिळवून देणारा दिवस आहे ।

विजयादशमीची कथा अशी सांगितले जाते की--

फार वर्षांपूर्वी वरतंतू नावाचे ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी खूप विद्यार्थी येत. अभ्यास करून मोठे होत. त्या वेळी मानधन किंवा फी नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरुदक्षिणा देत. या ऋषींकडे 'कौत्स' नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले कि, "मी तुम्हाला गुरुदक्षिणा म्हणून काय देऊ ? तुम्ही मागाल ते मी देईन. " ऋषींनी कौत्साची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. त्यांनी कौत्साला प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा, याप्रमाणे १४ विद्यांबद्दल १४ कोटी सुवर्णमुद्रा आणावयास सांगितल्या.कौत्स हे ऐकून गांगरून गेला. तो रघुराजाकडे गेला. परंतु राजाने त्याच वेळी विश्वजित यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता, तरीसुद्धा राजाने कौत्साकडे तीन दिवसांची मुदत मागितली आणि त्याने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहित होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याच्या पानांची, सोन्याची नाणी बनवून, ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली.

कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन, वरतंतू ऋषींकडे गेला व गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी त्यापैकी १४ कोटी सुवर्णमुद्रा परत घेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून, लोकांना लुटायला सांगितल्या. लोकानीं त्या वृक्षाची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवसापासून त्या झाडाची पूजा करून सोन्याची पाने लुटण्याची प्रथा सुरु झाली. प्रभु रामचंद्रांनी रावणासारख्या बलाढय योध्याचा वध करून शत्रुवर विजय प्राप्त केला तो याच दिवशी. देवी दुर्गेने महिषासुर राक्षसाला युध्द करून संपविले ते याच दिवशी. आणि त्यामुळेच तिला महिषासुरमर्दिनी असे म्हंटल्या जाऊ लागले. या आख्यायिकांचा इतिहास पाठीमागे असल्याने बरेच राजपुत आणि मराठा योध्दे आपल्या युध्द मोहिमांचा याच दिवशी शुभारंभ करीत असत. अज्ञानावर-ज्ञानाने. वैऱ्यावर-प्रेमाने आणि शत्रुवर- पराक्रमाने मात करुन विजय मिळवण्याचा हा दिवस विजयादशमी अतिशय शुभ समजला जातो.

साडेतिन मुहुर्तांपैकी एक असा हा दिवस कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्याकरीता अत्यंत शुभ समजला जातो.अनेक लोक या दिवशी नव्या व्यवसायाला सुरूवात करतात. नवे वाहन,





नवीन घर, फ्लॅट, या दिवशी खरेदी करतात वाहनाची पुजा केली जाते.सोने खरेदी करतात. आपल्या महाराष्ट्रात एकमेकांना सोन्याच्या रूपात आपटयाचे पानं दिली जातात. या दिवशी सिमोल्लंघन, सरस्वती पुजन, शमीपुजन, शस्त्रांचे पुजन आणि अपराजिता पुजन देखील केले जाते. तिन्ही सांजेला गावाबाहेर जात आपल्या गावाची सीमा ओलांडायची. आपटयाचे आणि शमीचे पुजन करायचे. त्या ठिकाणी अष्टदल रेखाटायचे व त्याच्यावर अपराजिता देवीची स्थापना करायची आणि तीला विजयाकरता वर मागायचा.

शमी शमयते पापम् शमी शत्रुनाशिनी । अर्जुनस्य धनुर्धारी रामस्य प्रियदर्शिनी ।।
करिष्यमाणयात्राया यथाकालम सुखम् मया । तत्रनिर्वीघ्नकर्त्रीत्वं भव श्रीरामपूजीता ।।

हा मंत्र म्हणून शमीच्या झाडाची पूजा करायची तसेच

अश्वंतक महावृक्ष महादोष निवारण । इष्टानाम दर्शनम् देही कुरु शत्रुविनाशनम् ।।

हा मंत्र म्हणून आपट्याचे पानाचे पूजन करायचे.

अपराजिता पूजन करताना

हरेण तु विचित्रेण भास्वत्कनकमेखला । अपराजिता भद्ररता करोतु विजयं मम् ।।

हा मंत्र म्हणतात.

आपटयाच्या झाडाला अश्मंतक आणि वनराज देखील म्हणतात. कफ व पित्त दोषांवर ही पानं गुणकारी समजल्या जातात. पांडव ज्यावेळी अज्ञातवासात निघुन गेले त्यावेळी त्यांनी त्यांची सर्व शस्त्रं शमीच्या झाडामधे लपवीली होती त्यामुळे विजयादशमीच्या दिवशी शमीची देखील पुजा केली जाते.

एकमेकांमधले परस्परांमधले प्रेम व्यक्त करण्याचा हा शुभदिन दसरा हा असा सण आहे. वर्षातील हाच एकमेव असा दिवस आहे ज्या दिवशी आपण आवर्जून एकमेकांची भेट घेण्याचा प्रयत्न करतो. फेसबूक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम आदी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन एकमेकांना शुभेच्छा देतो व सद्भावना व्यक्त करतो.भेटकार्डही दिली जातात.आपट्याची एकमेकांना जुळलेली पाने आपल्याला खूप मोठा संदेश देतात. ते आपण समजून घ्यायला हवे. 'सीमोल्लंघन' ही संकल्पना याच दिवशी निर्माण झाली. सीमोल्लंघन करायचे म्हणजे काय करायचे? तर 'सत्'वर विजय मिळवायचा. रावण वध हा प्रतिकात्मकअसेल; पण त्या निमित्ताने 'असत्'चा पराभव करायचा, हे सूत्र,त्यामागील उद्देश आहे.

अजूनही ग्रामीण भागात सिमोलंघना ऐवजी शिलंगण हा शब्द प्रयोग करतात. शिलंगणाचे सोने आणायला चला असे म्हणतात.

समाजजीवनाला एकत्रित ठेवण्याकरिता असे टप्प्याटप्प्यावर आलेले सण विविध नावांनी साजरे करताना त्याच्या विविधतेमधील एकता ही सगळयात मोठी शक्ती मानली गेली आहे. आजच्या सीमोल्लंघनाचा अर्थ पांडव काळातील शस्त्र हाती घेऊन बाहेर पडण्याचा नसून आजच्या समाजजीवनातील विस्कटलेली चौकट पुन्हा सांधण्याचा दिवस म्हणून अशा सणांकडे आजच्या काळात पाहिले पाहिजे.

'सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा'...हा प्रेमाचा आपुलकीचा संदेश देणारा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक साजरा केला जाणारा दसरा हा सण. या दिवशी समाजातील सर्व नागरिकांनी राग, द्वेष, मतभेद विसरून एकत्र येऊन संस्कृती जपली पाहिजे. राजकीय वैयक्तीक हेवेदावे संपवून विकासासाठी एकत्रित येणे आवश्यक आहे.

आजची परिस्थिती बघता, खूपच भयानक आहे.अनेक भागात झालेले बलात्कार,राज्याततले हुंडाबळी, विनयभंग, स्त्री भ्रूण हत्या यासारखे गैरप्रकार समाजात घडताहेत.एकीकडे आपण नऊ दिवस, देवी(स्त्री शक्तीची) ची उपासना करतो. स्त्रीशक्तीचा जागर म्हणतो. निरनिराळ्या क्षेत्रातील महिलांचा सत्कार करतो.।आणि समाजात अशा घटना घडतात.ही समस्त पुरुषांच्या साठी लाजीरवाणी गोष्ट आहे. शस्त्र, वाहन,सरस्वती, या बरोबरच स्त्री जातीचा सन्मान करून आपण सर्वांनी सीमोलल्लंघन करायचा संकल्प करायला हवा आहे.. तरच विजया दशमीला केलेले सीमोल्लंघनाचे सार्थक होईल.....चला तर वाईटाचा शेवट करुन चांगल्या विचारांची सुरुवात करु या. !! विजया दशमीच्या शुभेच्छा.!

# पूर्व वर्णद्वेषाची पदर उघडणी करणारी "द रूट्स"



भारत सोनवणे
मोबा. 9307918393

आधुनिक केसरी

**ॲलेक्स हेले हा अमेरिकन लेखक ज्यांची १९७६ साली "द रूट्स" ही कादंबरी प्रकाशित झाली अन् अमेरिकन विश्वात एकच खळबळ माजली. रूट्सने प्रत्येक एका विशिष्ट विचारसरणीची पार्श्वभूमी असलेल्या वाचकवर्गाला आवाहन केले अन् ही कादंबरी प्रत्येक एक स्वतंत्र विचारसरणी असलेल्या वाचकाच्या पसंतीस पडली. पुढे कित्येक वर्ष अन् आजही ही कादंबरी बेस्ट सेलर म्हणून कायमच चर्चेत राहिली आणि आजही आहे..!**

आफ्रिकन,अमेरिकन वाचकांसाठी ही कादंबरी त्यांच्यासमोर त्यांच्याच पूर्वजांचा भूतकाळ मांडणारी ठरली,वर्णद्वेषाची कथा कादंबरीतील वास्तव कथेतून सांगणारे ही कादंबरी ठरली आणि अमेरिकन पूर्वजांच्या कुटुंबाच्या स्थलांतरन आणि त्या भूतकाळातील एक दुःखद पर्व सांगू बघणारी ही कादंबरी..! पुढे कादंबरीबद्दल अनेक तारतम्य बाळगून अनेक वाद उफाळल्या गेले.परंतु हेलेच्या लेखन आणि संशोधनपद्धती आणि त्यांच्या कथनातील वस्तुस्थिती यामुळे या अश्या बळजबरीने उफाळून काढलेल्या वाद-विवादांचा कादंबरीच्या कामगिरीवर काही एक परिणाम झाला नाही..!

उलट "द रूट्स" या कादंबरीला आफ्रिकन आणि अमेरिकन इतिहासातील पौराणिक गाथा म्हणून बघितल्या जाऊ लागले.ज्यामध्ये गुलामगिरीत आफ्रिकन लोकांनी दुःख सहन केले आणि अमेरिकन समाजात त्यांच्या स्थानासाठी आफ्रिकन लोकांनी लढा दिला..! त्यामुळेच आजही अमेरिकन साहित्य विश्वातील एक लोकप्रिय अभिजात कादंबरी म्हणून ही कायम आहे.जी की अत्यंत प्रभावशाली आणि लोकप्रिय अशी कादंबरी ठरली आहे..!

११ ऑगस्ट १९२१ मध्ये हेलेचा न्यूयॉर्कस्थीत "इथाका" या ठिकाणी जन्म झाला.तो हेनिंग,टेनेसी या दोन्ही गावात मोठा झाला आणि पुढे त्यांचे कुटुंब स्थलांतरित झाल्यानंतरही एकट्याने आपले आपले काही आयुष्य त्यांनी याच ठिकाणी घालवले.हेलेची आई "बर्था" तो फक्त बारा वर्षांचा असताना वारली. हेलेचे वडील "सायमन" हे कृषी क्षेत्रातील सन्माननीय प्राध्यापक होते,ज्यांचे "द रूट्स" हे पुस्तक पूर्ण होण्यापूर्वीच निधन झाले..!

हेले शालेय जीवनात एक आपल्या विश्वात मग्न असणारा विद्यार्थी होता.शिक्षण झाल्यावर तो तटरक्षक दलात नोकरीस रुजू झाला.या काळात बऱ्यापैकी वाचन,लेखन चालू असल्याने त्यानं आपल्या स्वतःमध्ये लेखन करण्याची प्रतिभा आहे हे हेरले अन् मग त्याने विविध नियतकालिकांना छोट्यास्वरूपाचे लेख देण्यास सुरू केले..!


पुढे लेखनात त्याचे मन रमत गेले आणि वयाच्या सदतीसाव्या वर्षी त्याने नोकरी सोडली तेव्हा तो तटरक्षक दलाचा मुख्य पत्रकार झाला होता..! नोकरी सोडल्यानंतरच्या आयुष्यात मग रोजच्या जगण्यासाठी त्याचा संघर्ष सुरू झाला,अश्यातच एकदिवस हेलेला प्लेबॉयकडून "माईल्स डेव्हिस"ची मुलाखत घेण्यासाठी एक असाइनमेंट मिळाली,पहिलीच "प्लेबॉय मुलाखत" असल्यामुळे ती कुप्रसिद्ध म्हणावी अशी ठरली..!


त्यानंतर लवकरच,आफ्रिकी अमेरिकी मुस्लिम मंत्री व मानव आधिकार विषयाला घेऊन भाष्य करणारा कार्यकर्ता "माल्कम एक्स"सोबत त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तक लिहण्यास त्यानं मदत केली.जे की १९६५ मध्ये माल्कम एक्सच्या मृत्यूनंतर बेस्टसेलर पुस्तक बनले..! माल्कम एक्सवरील पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर,हेलेने स्वतःच्या कौटुंबिक इतिहासावर संशोधन करण्यास सुरुवात केली.त्याने टॉम आणि आयरीन मरे,त्याच्या आजी-आजोबांची नावे शोधून काढली आणि आफ्रिकेत किंटे कुटुंबाची माहिती त्याने काढली अन् मग सुरू झाली लिखाणाला संपूर्ण बारा वर्षांचा कालावधी घेत, "द रूट्स" या जगप्रसिध्द कादंबरीला...!

"ओमोरो" आणि "बिंता किंटे" यांच्या मुलाच्या जन्मापासून "जफुरे" नावाच्या छोट्या आफ्रिकन गावात रूट्स या पुस्तकाची सुरुवात होते.त्याचे प्रसिद्ध आजोबा "कैराबा कुंता किंटे"यांच्या सन्मानार्थ त्या जन्म झालेल्या मुलाचे नाव "कुंता किंटे" ठेवण्यात येते.तोच ज्याने "जफुरे" या गावच्या लोकांना भीषण दुष्काळाच्या सावटातून वाचवले..!

वयाच्या पाचव्या वर्षी कुंता दुसऱ्या काफोमध्ये पदवीधर होतो आणि तो शेळ्या पाळतो.वयाच्या दहाव्यावर्षी,कुंता आपले शालेय शिक्षण पूर्ण करतो आणि आपल्या सोबत्यांसोबत पुरुषत्वाचे प्रशिक्षण घेण्यासाठी जातो. ते प्रशिक्षण घेऊन आला की त्याला त्याची स्वतःची झोपडी मिळते तो स्वतःच्या झोपडीत जातो आणि पुढे चालून स्वतःची जमीन शेती करण्यासाठी मिळवतो.

एके दिवशी,ड्रम बनवण्याच्या लाकडाच्या शोधार्थ फिरत असताना, कुंता पांढऱ्या गुलामांद्वारे (अमेरिकन खलाशी) पकडला जातो,ज्यांना "टोबोब" म्हणतात..! पुढे महाकाय जहाजामध्ये युनायटेड स्टेट्सच्या लांबच्या प्रवासात पकडलेल्या कुंटाला आणि डझनभर इतर त्यांच्याच गाव सभोवतालच्या पुरुषांसह जहाजाच्या कोठडीत बांधून ठेवतात.संपूर्ण महासागर ओलांडून आणि अतिशय त्रासदायक प्रवास केल्यानंतर,कुंता आणि वाचलेले स्त्री-पुरुष यांना घेऊन जहाज व्हर्जिनियाला



पोहोचते.त्यावेळी कुंता त्यांच्या सुटके साठीचा कट रचतो..!

उपासमारीने बेहाल झालेला कुंता अंगात ताकद येताच तो तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करतो.परंतु तो पकडला जातो. तो पुन्हा पुन्हा असं तीन वेळा पळून जाण्याचा प्रयत्न करतो.चौथ्या प्रयत्नात त्याला पकडणाऱ्या दोन पांढऱ्या खलाश्यांनी त्याचा एक पाय अर्धा कापुन टाकला.त्यामुळे तो देहभान गमावतो आणि स्वतः ला नवीन कल्पना विश्वात शोधत राहतो.प्रचंड मार, घाण आणि उपासमार अशा छळ छावणीत कुंटा किंटे सापडलेला असतो. बोटीतून पूर्ण प्रवासभर हे छळ सुरूच असतात.त्यातून सुटायचे अनेक योजना होतात.परंतु अपयश आलं तर मृत्यू अटळ असतो...!

अश्या परिस्थितही तो जीवंत राहतो,तगदा राहून अनेक महिन्यांनी कुंटा दुसऱ्या देशात पोहोचतो.आणि एका श्रीमंत माणसाकडून विकत घेतला जातो.या श्रीमंत मालकांना 'मासा' असं आदराने बोललं जातं असत. मासा आपल्या दैनंदिन जीवनात त्यांचा या गुलामांचा वापर करत असत,कष्टाचे कामे त्यांच्याकडून करून घेत असत.हे लोकं असे अनेक गुलाम आपल्या पदरी बाळगून असत,ज्यामुळे की त्यांची श्रीमंती गणली जात असत..!

या पकडून आणलेल्या गुलामांकडून शेती कसून घेणे,प्राणी पाळणे,बागा,मळे फुलवणे,स्त्री गुलामांना मुलं सांभाळणे,स्वयंपाक-पाणी,स्वच्छता,शिवणटिपण आणि असे कामे दैनंदिन जीवनात करावी लागत असत..! वर्षा मागून वर्षे सरत राहतात आणि आता कुंटा किंटे त्याची मातृभाषा आफ्रिकन 'मंडीका' ही भाषा सोडून टॅबूबची भाषाही शिकून गेलेला असतो.'मंडीका' भाषेतील काही शब्द सतत उजळणी करून मनात तो जिवंत ठेवत असतो.स्वतःच्या देशातली मातृभाषा त्याला मनात जिवंत ठेवायची असते अन् यासाठी त्याचा आटापिटा चालूच असतो..!

सतराव्या वर्षी गुलाम झालेला कुंटा आता ३७ वर्षांचा झालेला असतो.जिथे गुलामगिरी करत असतो तिथल्याच 'बेल' नावाच्या चाळीस वर्षाच्या स्त्री गुलामाशी तो लग्न करतो.

यथावकाश त्याला मुलगी होते,तिचे नाव तो 'किझी' ठेवतो. किझीला घेऊन फिरतांना कुंटा तिला अनेक 'मंडीका' शब्द शिकवतो.त्याच्या 'जफर' खेड्यातल्या घडलेल्या सगळ्या गोष्टी सांगतो.कुंटाचं बालपण कसं गेलं,तो कसा शिकला,त्याचं कुटुंबीय वगैरे सगळं सांगत राहतो..!

"किझी" जशी तारुण्यात पदार्पण करते तशी एका आफ्रिकन गुलामाला पळून जाण्यासाठी मदत करतांना पकडली जाते.आता 'मासा' शिक्षा म्हणून तिला विकून टाकतो.तिची आणि कुंटा यांची ताटातुट होते.पुढे किझीला मुलगा होतो. त्याला ती 'जफर' मधल्या कुंटाविषयी सांगते जे जे तिला कुंटा किंटे ने सांगितलेले असते..! त्या मुलाला पुढे मुलं होतात आणि प्रत्येक पिढी कुंटाच्या बालपणापासून ते वर्तमान काळापर्यंत सगळ्या गोष्टी नवीन पिढीला सांगत जाते.थोडक्यात कादंबरीचा नायक कुंटा किंटे याच्या अनेक पिढ्यांची कहाणी उलगडणारी ही कादंबरी आहे..!

किझी चा मुलगा जेव्हा म्हातारा होतो तेव्हा त्यांना स्वातंत्र्य मिळतं.ते कसं मिळतं तेही खूप रंजक आहे,त्यासाठी आपल्याला ही कादंबरी ववाचायला हवी. शेवटी अशाच कुंटाच्या पुढच्या-पुढच्या पिढीतल्या एका मुलीला मुलगा होतो तो कोण हे रहस्य कादंबरी वाचल्यावर कळेलच..! कुंटाच्या वाट्याला आयुष्यभर जी गुलामगिरी आली तिच गुलामगिरी लक्षावधी आफ्रिकन वंशाच्या लोकांच्याही वाट्याला आली.ॲलेक्स हॅलेने त्यांचा आवाज या कादंबरीच्या माध्यमातून जगापुढे आणला आहे..! (**संदर्भ : वर्णीता**)

# इथे घराघरांत रावण, एवढे राम भेटतील कुठे ?



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आज आपल्याला आपल्यातीलच रावण दहन करण्याची वेळ आली आहे! आपल्यातील पंच ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यावर नियंत्रण ठेवून आपल्यातील अकराव्या मनाने या दहा इंद्रियरुपी रावणावर विजय मिळविण्याचा दिवस म्हणजे दसरा! या दहांना हरवून आपल्याला नियंत्रणात रहायचे आहे! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने आपल्यातील रावण जळणार आहे! तो जाळण्यासाठी आपल्याला भावाभावात राम-लक्ष्मणाचे प्रेम वृद्धिंगत करावे लागेल. त्याचबरोबर आपल्याला अनेक दुर्गुणांचे सिमोल्लंघन करावे लागेल! व्यसनमुक्तीचे सिमोल्लंघन! दारूमुक्तीचे सिमोल्लंघन! कट्टरता, भेदभाव, द्वेष, मत्सर इत्यादीचे सिमोल्लंघन करावे लागेल!**

सांस्कृतिक वैविध्याने नटलेल्या भारताला विविध सण-उत्सवांनी सजवून टाकले आहे! अनेक धर्म, भाषा, वेशभूषा, विविध प्रथा-परंपरा आणि त्याच अनुषंगाने संपन्न होणारे अनंत सोहळे! आधुनिक जगात हे सारं वेगळं असतांना, काळाच्या बदलाबरोबरच इथल्या उत्सवांनी सुद्धा कात टाकली असून, ते नव्या आचार-विचाराने संपन्न होत आहेत! भारतातील या विविध सण-उत्सवांपैकी एक सण म्हणजे आजचा दसरा, दशहरा विजया दशमीचा उत्सव किंवा धम्मचक्र प्रवर्तन दिन! नऊ दिवस मातृशक्तीची पूजा, मनोभावे आराधना केल्यानंतर दहाव्या दिवशी शेतातील अवजारांचे पूजन केले जाते! कृषीसंस्कृतीत आजच्या दिवसाला अनन्यसाधारण महत्व असून आजचा दिवस म्हणजे शेतकऱ्यासाठी सोनं लुटण्याचा दिवस! शेतातील विविध पिकांच्या पूजनाचा शुभ दिवस!

दसऱ्याच्या अनुषंगाने आजच मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाने दशानन रावणाचा पराभव केलेला, वध केलेला दिवस म्हणजे दशहरा! आज रामाचा विजय झाला, त्यामुळेच आजचा दिवस विजयादशमी म्हणून साजरा केला जातो अशा धर्मग्रंथात आख्यायिका आहेत. त्याचप्रमाणे आजच दुर्गादेवीने महिषासुरावर विजय मिळवलेला दिवस म्हणूनसुद्धा आज विजया दशमी साजरी केली जाते! त्याचबरोबर आज प्रेमाचे प्रतिक म्हणून आपट्याची पानं सोने म्हणून वाटले जातात आणि आजच्याच म्हणजे दसऱ्याच्या दिवशी सिमोल्लंघन सुद्धा केले जाते! अशी विविध मिथके असलेला हा आजचा दशहरा! त्याचबरोबर महान चक्रवर्ती राजा सम्राट अशोकाने कलिंगच्या युद्धात झालेला नरसंहार पाहून आजच्याच दिवशी विजया दशमीच्या मुहूर्तावर शांतीचा मार्ग अवलंबून बुद्ध धम्माचा स्वीकार केला ती हीच अशोक विजया दशमी! हाच धागा पकडून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आजच्याच दिवशी १९५६ साली आपल्या हजारो अनुयायांसह नागपूरच्या दिक्षाभूमिवर बौद्ध धम्म स्वीकारला! धम्मचक्र प्रवर्तन दिन! असे विविधरंगी धर्माचे कंगोरे असलेला आजचा हा दसरा, विजया दशमी किंवा धम्मचक्र प्रवर्तन दिन!

मित्रहो, बदलत्या प्रवाहानुसार माणसाने सुद्धा बदलणे क्रमप्राप्त आहे! आज आपण एकविसाव्या शतकात आलो असून भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. आज आपल्याला शस्त्र पूजन करण्यापेक्षा शास्त्र पूजन म्हणजेच ग्रंथ पूजन करण्याची वेळ आहे! काळ झपाट्याने बदलतो आहे. सगळीकडे खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे वारे जोरात वाहत आहेत. विविध शासकीय क्षेत्रं हळूहळू संकुचित होत आहेत. दिवसेंदिवस रोजगाराच्या संधी सीमित होत आहेत. त्याचबरोबर रोजच नानवीन समस्या तोंड काढतांना दिसत आहेत. यात आपण आपले सण-उत्सव बदलत्या कालानुरूप साजरे करायला हवेत. ज्याप्रमाणे आपण नऊ दिवस



मातृशक्तीचा सन्मान, स्त्री सुरक्षा याचा जागर केला, यातूनच नवविधा भक्तीने आपले दैनंदिन जीवन-जगणे समृद्ध करणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने आज दसऱ्याच्या दिवशी आपण शस्त्र घेऊन कोणता रावण मारायचा आहे? आज सर्वत्र मिडीयाचा हाहाकार, उद्रेक झाला आहे! सद्विचार, सद्वर्तनाचा प्रचार-प्रसार करणे जोरात सुरु असले तरी वाईट गोष्टी त्यापेक्षाही जोरात प्रसारित होताहेत. यावर कुठेतरी विचार होणे आणि त्यावर योग्य ते निर्बंध येणे गरजेचे आहे! हा रावण मरणे गरजेचे आहे!

आज आपल्याला आपल्यातीलच रावण दहन करण्याची वेळ आली आहे! आपल्यातील पंच ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यावर नियंत्रण ठेवून आपल्यातील अकराव्या मनाने या दहा इंद्रियरुपी रावणावर विजय मिळविण्याचा दिवस म्हणजे दसरा! या दहांना हरवून आपल्याला नियंत्रणात रहायचे आहे! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने आपल्यातील रावण जळणार आहे! तो जाळण्यासाठी आपल्याला भावाभावात राम-लक्ष्मणाचे प्रेम वृद्धिंगत करावे लागेल. त्याचबरोबर आपल्याला अनेक दुर्गुणांचे सिमोल्लंघन करावे लागेल! व्यसनमुक्तीचे सिमोल्लंघन! दारूमुक्तीचे सिमोल्लंघन! कट्टरता, भेदभाव, द्वेष, मत्सर इत्यादीचे सिमोल्लंघन करावे लागेल!

दिवसेंदिवस माणूस संकुचित होत असून विविध गोष्टींचे प्रदर्शन करण्याचा कालखंड आला आहे. आज माणसं बोलतांना दिसत आहेत, मात्र त्यांचे आचरण शुद्ध राहिले नाही. आपल्या भोवताल आणि घराघरात रावणरुपी अनंत समस्या आणि रोग ठाण मांडून बसले आहेत. माणसांचा संवाद संपत चालला आहे. ही सगळी बदलेली परिस्थिती पाहून कवी व्यथित होऊन या बोलक्या आणि ओळी लिहतोय,

**असा महिमा या कलीचा, आता मी जावू कुठे ?**
**इथे घराघरांत रावण, एवढे राम भेटतील कुठे ?**

काळ झपाट्याने कूस बदलतो आहे. एक भाऊ वनवासाला निघाल्यानंतर दुसरा भाऊ कोणताही विचार न करता त्याच्या संरक्षणासाठी जाणारा लक्ष्मण कुठे? आणि आज मटणाचा रस्सा दिला नाही म्हणून भावाच्या डोक्यात खलबत्ता घालून जीव घेणारा भाऊ कुठे? आपल्या सावत्र आईने वनवासाला जाण्याची आज्ञा पालन करणारा सुपुत्र राम कुठे आणि दारूसाठी पैसे दिले नाही म्हणून आपल्याच जन्मदात्रीचा धारदार चाकूने खून करणारा आजचा कुपुत्र कुठे? अशी एक ना अनेक उदाहरणे आज आपल्या भोवताल घडत आहेत. घराघरांत वाढणारी रावणवृत्ती ही येणाऱ्या काळासाठी मोठी धोक्याची घंटा आहे. आज तरुण पिढीला मोबाईल आणि व्यसनांनी विळखा घातला आहे. महाविद्यालयात उच्चशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे वर्तन विचित्र झाले आहे. मुलांचे उपस्थितीचे प्रमाण कमालीचे घटले आहे!

जर ही मुलं वर्गात येऊन बसलीच नाही तर यांच्यावर संस्कार होणार कसे? ही पिढी प्रज्ञावंत, गुणवंत, ज्ञानवंत होणार कशी? या पिढीत शांती, संयम, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, देशप्रेम, मूल्यशिक्षण इत्यादी संस्कार रुजणार कसे आणि कुठे? आणि जर हे झालेच नाही तर आपल्या देशाचे भविष्य व्यसनी-दारुड्या-अशिक्षित-अज्ञानी तरुणांच्या हाती जाणार का? अशी अनामिक भीती माझ्यासारख्या पापभिरू, शिक्षक माणसाला वाटणे गैर काय?

आज घराघरात कौशल्या-दशरथ सारख्या आई बापांची गरज आहे. परंतु आज घराघरांत कैकयी आणि मंथरा सारख्या प्रवृत्ती वाढल्या तर पुन्हा राम वनवासाला जाणार का?

**कुठे बाप दशरथ अन कुठे माता कौशल्या ?**
**वाढताहेत मंथरा अन कैकयी जिथे तिथे**
**सांग भरता, करू काय अन जाऊ कुठे ?**
**इथे घराघरांत रावण, एवढे राम भेटतील कुठे ?**

आज ह्या सर्वच प्रवृतीचे दहन करून आपल्याला रामासारखा मातृपितृभक्त आणि लक्ष्मणासारखा बंधुप्रेमी भाऊ घराघरांत निर्माण करण्यासाठी इथे व्यसनं आणि दुर्गुणांचा त्याग क्सरून सद्गुणांची कास धरावी लागेल!

चला तर मग, दुर्गुणांचे सिमोल्लंघन करून सद्गुणांची कास धरूया, उद्याच्या सकारत्मक बदलाची आस धरूया! सम्राट अशोकाने घालून दिलेला 'पंचशील-बुद्धधम्म' आणि रामाचा 'सर्वे सुखिनो भवन्तु सर्वे सन्तु निरामयः' या मार्गांनी शांतता-संयम-प्रज्ञा-शिल-करुणा-बंधुता-देशप्रेम या महत्वपूर्ण बाबींचे प्रकर्षाने जीवनात पालन करून आपला भारत देश समृद्ध-संपन्न-स्वावलंबी बनवूया!

जय श्रीराम! नमो बुद्धाय!

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

## विजयादशमीच्या दिवशी शस्त्रपूजन का करतात?

भारतात विजयादशमी हा सण अश्विन महिन्याच्या नवमीनंतर म्हणजेच नवरात्री संपल्यानंतर साजरा केला जातो. वास्तविक, हा सण एकीकडे प्रभू श्रीरामाच्या लंकापती रावणावर विजय मिळवण्याचा उत्सव आहे, तर दुसरीकडे आपल्या ऐतिहासिक परंपरांचे विसर्जन करण्याचाही सण आहे. दरवर्षी विजयादशमीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. पण ही परंपरा सनातन धर्मापासूनच पाळल्या जात आहे. या दिवशी शस्त्रांची पूजा करण्यासाठी विशेष कायदा आहे. असे मानले जाते की या दिवशी क्षत्रिय शस्त्रांची पूजा करतात तर ब्राह्मण विशेषतः या दिवशी शस्त्रांची पूजा करतात. यावेळी हा उत्सव ५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणार आहे. या सणावर शस्त्रपूजनाचा विशेष कायदा आहे, आपल्या सैन्यातही विजयादशमीच्या सणाला शस्त्रपूजन केले जाते. विजयादशमीच्या दिवशी कोणतेही काम सुरू केले तरी त्यात यश नक्कीच मिळते. आजही शस्त्रपूजनाची ही परंपरा प्राचीन काळापासून सुरू आहे, त्याकाळीही योद्धे युद्धावर जाण्यासाठी दसऱ्याचा दिवस निवडत असत. या दिवशी पूजा केली जाते, 9 दिवस शक्ती उपासना केल्यानंतर, 10 व्या दिवशी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विजयाच्या कामनाने शस्त्रांची पूजा केली जाते, चंद्रिकेचे स्मरण केले जाते, विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर शक्तीरूप दुर्गा, कालीची पूजा केली जाते. सोबतच शस्त्रपूजेची परंपरा शतकानुशतके चालत आलेली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे, पोलीस विभागातर्फे त्यांच्या शस्त्रांची पूजाही केली जाते. आपल्या देशात विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर देवीपूजनासह शस्त्रपूजनाची परंपराही कायम आहे. ही शस्त्रपूजा फक्त दसऱ्याच्या दिवशीच का केली जाते? या संदर्भात अनेक कथा आहेत. एका पौराणिक कथेनुसार, रावणावर विजय मिळवण्यासाठी रामाने नवरात्रीचे उपवास केले होते, जेणेकरुन देवी दुर्गेची शक्ती त्याच्यामध्ये यावी किंवा दुर्गा त्याच्या विजयात मदत करेल. दुर्गा ही शक्तीची देवी असल्याने आणि शक्ती मिळविण्यासाठी शस्त्रेदेखील आवश्यक आहेत, म्हणून रामाने शस्त्रांनी दुर्गेची पूजा केली आणि दसऱ्याच्या दिवशी रावणावर विजय मिळवला. तेव्हापासून नवरात्रीत शक्ती आणि शस्त्र पूजेची परंपरा रुजली आहे. दसऱ्याच्या दिवशी भगवान इंद्राने राक्षसांवर विजय मिळवला होता असे मानले जाते. महाभारताचे युद्धही याच दिवशी सुरू झाले आणि पांडव वनवासानंतर या दिवशी पांचाळमध्ये आले, जिथे अर्जुनाने धनुर्विद्येच्या प्रभुत्वाच्या जोरावर द्रौपदीला स्वयंवरात जिंकले. या सर्व घटना शस्त्रपूजनाच्या परंपरेशी संबंधित आहेत. राजा विक्रमादित्यने दसऱ्याच्या दिवशी हरसिद्धी देवीची पूजा केली, पूजा करण्यात आली. या दिवशी दुर्गादेवीला प्रसन्न करून छत्रपती शिवरायांनाही तलवार प्राप्त झाली होती, असे मानले जाते. तेव्हापासून दसऱ्यापासूनच मराठे आपल्या शत्रूवर हल्ला करू लागले. महाराष्ट्रात आजही शस्त्रपूजा मोठ्या थाटामाटात केली जाते.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306



# भारतासमोर असलेली आव्हाने

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

प्रमाणापेक्षा जास्त कधी कधी थंडी पडते. हवामान बदलाची समस्या ही सर्वात मोठी समस्या आहे. ही समस्या भारताला आव्हानात्मक आहे.

8) ऑनलाइन पेमेंट करण्यात अडचणी

खूप लोक हे संगणक साक्षर नाहीत तसेच मोबाईल साक्षर पण नाहीत. त्यामुळे खुप लोकांना ऑनलाइन पेमेंट करण्यात भरपूर अडचणी येतात. त्यामुळे 100% कॅशलेस इकॉनॉमी भारतात होण्यात अडचणी येत आहेत. भारतीय स्वातंत्र्याचे 75 वर्ष उलटल्यानंतरही भारतासमोर 100% अर्थव्यवस्था कॅशलेस होण्याचे मोठे आव्हान आहे.

9) संस्कृती टिकवून ठेवणे

आज काल ड्रेस घालणे, लाईफस्टाईल, खाण्याचे पदार्थ, विचार या सगळ्यांमुळे भारतीय संस्कृती टिकवून ठेवणे मोठे आव्हान आहे. आजकाल वाढदिवस साजरे करणे, परकिय लोकांसारखे कपडे घालने, व्हॅलेंटाईन डे साजरे करणे, चायनीज मेनू व इतर परकिय मेनू यामूळे तसेच महिला आज शॉर्ट ड्रेस घालत आहेत . या सगळ्या गोष्टींमुळे भारतीय संस्कृती टिकून ठेवणे हे भारतासमोर मोठे आव्हान आहे आणि त्यात इंग्रजी भाषेची मोठी भर पडते आहे. इंग्रजी भाषेमुळे आपल्या संस्कृतीच्या भाषेवर मोठा आघात झालेला आहे.
त्यामुळे संस्कृती टिकून ठेवणे हे भारतासमोर मोठे आव्हान आहे.



**10) विजेचा पुरवठा**

आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे . उन्हाळ्यात हिवाळ्यात शेतीला बोअरचे भरपूर पाणी द्यावे लागते. पण विज खूपदा जाणे-येणे करते. विजेच्या लपंडावामुळे शेतकरी ओलिताची शेती करू शकत नाही. उद्योगधंद्यांसाठी कारखान्यांसाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात वीज लागते. तसेच घरगुती उपयोगाकरीता मोठ्या प्रमाणात विजेची आवश्यकता भासते. त्यात भारताला स्वातंत्र्य मिळून 25 वर्षं उलटून गेले तरी कोळसा संपला अशी ओरड मधातच निर्माण झाली होती. आता पुढे मोठ्या प्रमाणात वीज निर्माण करणे हेच एक भारतासमोरचे मोठे आव्हान आहे.

**11) अमली पदार्थांची तस्करी**

आजकालची युवा पिढी व्यसनाच्या खूप आहारी गेलेली आहे. खूप लोकं व्यसनांमुळे बरबाद झाले आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतात अमली पदार्थांची तस्करी काही लोक करत राहतात. त्यामुळे भारताची युवक पिढी बरबाद होत आहे. 30,000 किलोची अमली पदार्थांची विल्हेवाट लावायची आहे अशा आशयाची बातमी नुकतीच 27 ते 28 जुलै 2022 ला टीव्हीवर बघण्यात आली होती. त्यामुळे अमली पदार्थांच्या तस्करीवर नियंत्रण ठेवणे हे भारतासमोरचे मोठे आव्हानच आहे.

**12) खेळांमधील आव्हान**

ऑलम्पीक गेम्स मध्ये आपण पाहतो अमेरिका, चीन ही दोन राष्ट्र मोठ्या प्रमाणात गोल्ड मेडल घेतात. त्यांच्या तुलनेत भारताला खूपदा एकही गोल्ड मेडल मिळत नाही हे खूपच लाजिरवाणी गोष्ट आहे हे खूपदा आपण बघितले आहे.यावर्षी ला मात्र जवळपास 50 पर्यंत गोल्ड मेडल भारताने वेगवेगळ्या स्पर्धामध्ये प्राप्त केलेले आहेत. ही खुप आनंदाची बाब आहे पण तरीही ऑलम्पिक मध्ये आपल्याला अमेरिका आणि चीन यांच्या पुढे जाऊन सर्वात जास्त गोल्ड मेडल कशाप्रकारे प्राप्त करता येतील ही एक आव्हानात्मक गोष्टच आहे.

जर भारताने आपल्यासमोर असलेली आव्हाने समर्थपणे पेलली तर निश्चितच भारत जगामध्ये आर्थिक महासत्ता होईल आणि भारत एक नवा देश म्हणून उदयाला येईल जो सर्व जगाचे नेतृत्व करेल.

# रावणावर विजय



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**विजय म्हणजे केलेल्या श्रमाचे साफल्य! विजय प्रत्येकालाच हवा असतो मग तो कुठल्याही क्षेत्रातील असो. विजय मिळवतांना ज्या साधनांचे सहकार्य घ्यावे लागले मग ती साधने अश्वासारख्या प्राण्यांची असोत किंवा शस्त्रे, यंत्रे, वाहने , अवजारे यांच्यासारखी निर्जीव असोत त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून आपण कालच विजयादशमी म्हणजे दसरा साजरा केला. पापांचे क्षालन करणाऱ्या तसेच रामाला आवडणाऱ्या शमीने आपल्यावर विजय मिळवण्यासाठी कृपा करावी यासाठी तिचे पूजनही आपण केले.**

शमी शमयते पापं शमी लोहितकण्टका ।
धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादिनी ।।

ऐतिहासिक काळामध्ये दसऱ्याच्या दिवशी राजे स्वारीवर निघत किंवा पर मुलखातून लुटून आणलेली धनरूपी महालक्ष्मी घरी येत घेऊन येत. ही संपत्ती त्याकाळी प्रामुख्याने सुवर्णांची असे. आता मात्र आपटा म्हणजे सोन्याची पाने कल्पून ती दसऱ्याला देवाला अर्पण करतात, वाहातात आणि एकमेकांना देतात-घेतात, हे प्रतिकरूपतील आपट्याची पाने देऊन आपण परमेश्वराचे आणि थोरामोठ्यांचे आशीर्वाद कालच घेतले.

एकदा संपादन केलेल्या विजयावर समाधान मानून स्वस्थ बसून चालणार नसते. हा विजय सतत कायम राहिला पाहिजे यासाठी आश्विन शुद्ध दशमीला शमीची पूजा करून सीमोल्लंघननासाठी जाण्याची प्रथा पार पडली पण आजकाल पूर्वीसारखी लढाई करून पराक्रम कुठे गाजवावा लागतो? असा प्रश्न काही लोक विचारतात. आपली रोजची जगण्याची लढाई देखील काही कमी नाही. नोकरी असो कि व्यवसाय, रोजच नवनवीन प्रश्न अकल्पितपणे समोर येतात, आपल्या प्रत्येकाचा वैयक्तिक- सामाजिक कुठे ना कुठे अशा लढ्यात सहभाग असतोच. यासोबतच स्वतःचा सर्वांगीण विकास साधून घ्यायचा असल्यास आपल्यातील काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर या षडरिपु वर



विजय मिळवणे सोपं आहे का ? रोजच्या आपल्या या लढ्यात चांगुलपणाच्या बाजूने आपली ताकत लावायला कमी पडू नये याचसाठी हे दसऱ्याचे पूजन. वैयक्तिक अडचणींसोबतच दिवसेंदिवस सामाजिक प्रश्न सुद्धा वाढतच आहेत. कुणाच्या कुणाच्या मनातील रावण जागृत होऊन अल्पवयीन मुलींवर, स्त्रियांवर पाशवी अत्याचार, लैंगिक हिंसा, कौटुंबिक अत्याचाराच्या बातम्या नेहमीच्याच होत आहेत. लिंगभेद कमी होण्याऐवजी वाढतांनाच दिसत आहे. कलियुगात वाईट आणि हिंसक प्रवृत्ती कमी होण्याचं नाव घेत नाहीये. माणुसकीसुद्धा हळूहळू हरवत चालली आहे. कलीच्या या युगात सापडेना खरी माणुसकीची नस। जिकडे तिकडेच दिसतो माणसा माणसात राक्षस ।। आरोग्य-शिक्षण, कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार थांबता थांबत नाही, काही ठिकाणी वाचा फुटत नसली तरी सोबत कौटुंबिक हिंसाचारही आहेच. अधूनमधून का होईना ठिकठिकाणी माणसातला रावण जागृत होत आहेच. दुष्ट व असूर प्रवृत्तीचा विनाश करण्यासाठी आपण दरवर्षी प्रतिकात्मक रावण दहन करतो, पण मनातील रावण मात्र कधी असूया, द्वेष, वासना, तिरस्कार, पैसा, मोह, अहंकार अशा वाईट प्रवृत्तीच्या रुपात कुठूनतरी अचानक उगवतो अन घातक ठरतो. ह्या रावणाच्या प्रत्येक शिराखाली बलात्कार, स्त्रीभ्रूण हत्या, विनयभंग, अल्पवयीन मुलींवर अत्याचार, व्यसनाधीनता, बालकामगार, भ्रष्टाचार, फसवणूक, गुंडगिरी,वृद्धांचा अपमान समाजातील वाईट म्हणजेच रावणी प्रवृत्तीं दडल्या आहेत. दाखवण्यासाठी आपण दरवर्षी हा रावण जाळतो । आपण आपल्याच मनात एक दुष्ट रावण पाळतो ।। आपल्या मनातही हा रावण ठाण मांडुन बसला आहे. हा रावण म्हणजे नकळत अगदी सहज पसरणारी, दुराचार दुर्गुणरूपी वाईट प्रवृत्ती. मनातला रावण सळसळता ठेवून बाहेर पोकळ प्रतिमा जाळण्याला काय अर्थ आहे? या दसऱ्याला रावणी मानसिकतेचे दहन म्हणजेच आपल्यातला रावणाचे दहन आपणच करून रावणवृत्ती चा नायनाट करु या. जाळणारच आहे मुद्दा तर अहंकार मनातला जाळ । अंतःकरण उजाळता निघेल आतला मी पणाचा मळ ।। दसऱ्याला प्रतिकात्मक रावण दहन करण्यापेक्षा मनातला हा रावण नष्ट करता आला तर फारच चांगले नाही का? बाहेरचा नको आतला रावण जाळू या. मनातला दुर्गुणांचा रावण जाळायला यापेक्षा उत्तम मुहूर्त नाही! मागचे नऊ दिवस आपण सगळे जगन्मातेच्या उपासनेत आनंदरत होतो. तिचा प्रत्येक पूजनदिवसही आपण एकत्र साजरा केला. अहंकाराचे विसर्जन करावे असे सांगत एकनाथ महाराजांनी आपल्याला जोगव्याच्या रुपाने दिलेली भक्तीची शिकवण आपण गेले नऊ दिवस देवीला साक्ष ठेऊन आरतीरूपात म्हणत आलो.

नवविध भक्तिच्या करीन नवरात्रा ।
करुनी पोटी मागेन ज्ञानपुत्रा।
धरीन सद्भाव अंतरीच्या मित्रा ।
दंभ संसार सांडिन कुपात्रा ॥
पूर्ण बोधाची घेईन परडी ।
आशा तृष्णेच्या पाडीन दरडी ।
मनोविकार करीन कुर्वंडी ।
अद्भूत रसाची भरीन दुरडी ॥

म्हणजेच श्रवण, कीर्तन, विष्णोस्मरण, अर्चन, वंदन दास्य, सख्य, आत्मनिवेदन ह्या नवविधा भक्तीला अनुसरून करील. अज्ञानी माणसापेक्षा ज्ञानी साधकाला अहंकाराची फार भिती असते म्हणून ज्ञानाच्या साठ्याला अहंकार शिवु देणार नाही. दंभ म्हणजे अहंकार सोडून षड्रिपुंचा संग सोडून, कामक्रोधाला झाडुन मोकळे करत ज्ञान रुप बोधाची परडी भरेन. आशा, इच्छा, तृष्णा यांना या देहरुप घरातुन घालवुन देईन. मनात उठणारे विकल्प विकार यांना सोडुन एकाग्रता निर्माण करुन अमृतरुपी अद्भुत रसाची दुरडी भरुन तुझ्या सगुण स्वरुपाकडे धाव घेईन आणि तुझा जोगवा मागेन. या आरतीला प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करत कुणी दुःखात असेल, असहाय्य असेल तर तसेच तिष्ठत ठेवण्यापेक्षा त्यांना सर्वतोपरी मदत करत रूढी परंपरा जोपासू या. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेला दसरा परस्परांतील प्रेम वृद्धींगत करायलाही शिकवतो आपल्या प्रत्येकाच्या आतली माणुसकी आणि माणसं जपूया आणि आजपासून आपल्याला प्रेरणा, आधार, साथ, सोबत, धीर देणाऱ्या सर्व वडीलधाऱ्या व्यक्तिमत्वांसमोर नतमस्तक होऊ या. तसेच आम्हाला या मायारूपी संसारात राहून तुझे नामस्मरण सतत घडत राहो आणि हा संसार तरून जाण्याचे सामर्थ्य मिळो हेच मागणे प्रभू श्रीराम आणि आई जगदंबेकडे मागू या. सामाजिक जीवन गढूळ केलेल्या धर्मभेद, जातीभेदाच्या सीमांचे उल्लंघन करून बंधुभाव प्रस्थापित करत लक्ष्मी-सरस्वती म्हणजेच धन आणि ज्ञानाची कास धरत प्रगतीच्या मार्गावर पुढे पाऊल टाकले तर तोच रावणावर विजय म्हणजे खरा दसरा होईल.

# तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ॲपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ॲपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.**

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोंघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ॲपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ॲपल 1 पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने



अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ॲपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ॲनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ॲपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ॲपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ॲपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ॲपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ॲपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ॲपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ॲपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# 5 ऑक्टोबर आंतरराष्ट्रीय शिक्षक दिवस

आधुनिक केसरी

**जगातील शिक्षकांसाठी 5 आक्टोंबर सन्मानजनक दिन आहे.शिक्षकांच्या प्रती सहयोग व आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यातील पिढीची आवश्यकता पुर्ण व्हावी याकरिता शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या विशिष्ट दिवसाला महत्व आहे.जगातील शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळावे व शिक्षणामध्ये नवीनीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो.**

5 आक्टोंबर 1966 रोजी पॅरिसमध्ये अंतर सरकारी सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात "टीचिंग इन फ्रीडम" संधीवर हस्ताक्षर करण्यात आले.यानंतर 1994 ला युनेस्कोमध्ये एक सम्मेलन आयोजित करण्यात आले होते व यात 5 आक्टोंबर जागतिक शिक्षक दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली आणि तेव्हापासून 5 आक्टोंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शिक्षक दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. जागतिक स्तरावर ही बाब सर्वांनाच समजायला पाहिजे की गुरू शिष्याचे काय नाते असते.शिक्षक हा असा चेहरा आहे की तो लाखो ते करोडो विद्यार्थी घडवीतात म्हणजेच जग व देश घडवितो.शिक्षणा विषयी अचूक माहीती देने व प्रत्येक गोष्टीचे महत्व समजावून देणे संपूर्ण शिक्षकांचे प्रथम कर्तव्य असते.यामुळेच आपण घडतो नंतर देश घडते व याचा संपूर्ण प्रभाव जगावर पडतो.शिक्षक दिनाचा महत्त्वपूर्ण उद्देश म्हणजे शिक्षकांना सन्मान मिळणे व विद्यार्थ्यांना देश घडवीण्यासाठी प्रोत्साहीत करने.आपण जगात आधुनिकीकरण,यांत्रीकरण, औद्योगिकीकरण यांची वाटचाल जी पहात आहोत ती शिक्षकांपासुनच निर्माण झालेली उर्जाच म्हणावी लागेल. आपण पहाले की करोणा काळात ऑनलाइन शिक्षण प्रणाली सुरू होती.परंतु विद्यार्थीवर्ग ऑनलाईन शिक्षण प्रणालीला जवळ करायला तयार नव्हते.त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते ऑनलाईन राहुच शकत नाही.कारण करोना काळातील दोन वर्षांच्या काळात संपूर्ण जगातील विद्यार्थी शिक्षकांपासुन व शाळा-कॉलेजपासुन दुरावले त्यामुळे संपूर्ण शिक्षणाचा खोळंबा झाला व आज विद्यार्थांना त्यांचे प्रायश्चित्त भोगावे लागत आहे आणि ऑफलाईन(प्रत्यक्ष) शिक्षण जड होतांना दिसत आहे.ऑफलाईन शिक्षणामुळे जेवढी ज्ञाणामध्ये भर पडते,तेवढी ऑनलाईन(अप्रत्यक्ष)शिक्षण प्रणालीत पडत नाही हे आपल्याला कोरोनाने दाखवून दिले.यामुळे प्रत्यक्षात शिक्षणाने जवळीक वाढुन ज्ञाणात मोठी भर पडते.प्रत्येक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करीत असतो. यामध्ये भारतात माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म दिवशी म्हणजे 5 सप्टेंबरला शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो,चीन 27 ऑगस्ट,रूस 5 आक्टोंबर अशाप्रकारे जगातील अनेक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करतात.कारण यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे अतूट संबंध निर्माण होवून गुरू-शिष्याचे नाते निर्माण होतात.यामुळे शिक्षणाचे आगळावेगळे महत्व दिसून येते.परंतु 5 आक्टोंबर आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनाचे वेगळेच महत्व आहे कारण संपूर्ण जग एकाच दिवशी शिक्षकांच्या गुणवत्तेची पावती जगाला देत असते व उत्सहाचे वातावरण निर्माण करतो.यामुळे जगातील शिक्षकांचा मानसन्मान वाढतो व गुरू-शिष्याचे घनिष्ठ संबंध निर्माण होते.जगात गुरू-शिष्याचे नाते आजचेच नसुन पुरातन काळातील आहे.ऋषी-मुनि,देव-दानव,राजे-महाराजे, थोर पुरुष, क्रांतिकारक याची संपुर्ण वाटचाल शिक्षकांपासुनच निर्माण झाली आहे.

**रमेश लांजेवार, नागपूर**
**संपर्क क्र. 9921690779**

# पंकजा मुंडेंसाठी हा दसरा मेळावा नसून घसारा निघून पिसारा फुलवणारा कृपामेळा असेल



सुनिल सिरसाट
संपर्क क्र. : 9422742442.

आधुनिक केसरी

**अलीकडच्या पाच वर्षात महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टी पंकजा मुंडे यांना दरवेळेला समोर आलेल्या संधीला अगदी हळुवारपणे हुलकावणी देत वेळोवेळी त्यांना अपमानित करत असल्याचा बीड जिल्हा, मराठवाड्यासह महाराष्ट्रातील मुंडे प्रेमींचा दावा-आरोप असून वेळोवेळी कार्यकर्त्यांच्या भावनांचा उद्रेक झाल्याचा आणि पंकजा-प्रीतम मुंडे भगिनींनी तो थोपवल्याचाच अलीकडे पाहावयास मिळत आहे.**

पंकजा सध्या साध्या आमदारही नाहीत आणि मग त्यांना प्रवाहात कुठेच न ठेवण्याचा मनसुबा बाळगुन असणा-या चार-दोन प्रमुख नेत्यांच्या हट्टापायी पंकजांच्या कार्यकर्त्यांच्या यापुढील उद्रेक हा महाराष्ट्र भाजपाला कदापी परवडणारा नसल्याने इच्छा नसताना भारतीय जनता पार्टीने पंकजा मुंडे यांना इच्छेविरुद्ध बळच राष्ट्रीय सचिव पदाची नावाला बोळवण केल्याचे चित्र सध्या असून त्याने खुद्द पंकजा आणि कार्यकर्ते कदापीही खुश असल्याचे चित्र सध्याच्या वातावरणावरुन तरी दिसुन येत नाही. तसेच पंकजा आणि महाराष्ट्र भाजपातील सध्याचे एकंदरीत वातावरण अलबेल नसून तो एक तात्विक देखावा असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यातच वैद्यकीय क्षेत्रात अगदी हुशार डॉक्टर म्हणून ज्यांचा नावलौकिक आहे व ज्यांनी या अगोदर खासदारकीची एक टर्म पूर्ण केलेली आहे. अशा विद्यमान खासदार डॉक्टर प्रीतम मुंडे यांना केंद्रात कमीतकमी केंद्रीय राज्यमंत्री म्हणून घेतील आणि पंकजाताई बाबतीतची



नाराज उणीव भरून निघेल ही महाराष्ट्रातील मुंडे प्रेमींची भाबडी आशाही राज्य-केंद्र भाजपाने फोल ठरवल्याने सबंध महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील मुंडेप्रेमी वर्ग मोठ्या प्रमाणात दुखावलेला असून भाजपाला तसेही ते परवडणारे नाही. परंतु दोन्ही मुंडे भगिनींच्या सहनशीलतेचा बांध अजून तरी फुटलेला नाही. आपल्या वडिलांची शिकवण जपत त्या हे सारं शेवटच्या टप्प्यात ज्या पद्धतीने स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांना स्व-पक्षातच सारकाही सहन करावं लागलं होतं आणि काहीच झाले नाही असेच दाखवत त्यांनी ज्या पद्धतीने आपला संयम ढळू दिला नाही. अगदी त्याप्रमाणेच पंकजा-प्रीतम भगिनीही अगदी संयमाने धिरोदत्तपणे सारेकाही मनाविरुध्द होऊनही आपल्या वडिलांप्रमाणेच घेत आहेत. सध्यातरी त्यांना भाजपातील ऐक ठराविक मंडळींचा गट ज्यापद्धतीने पाण्यात पाहत आहे. ते त्या सहनच करताना दिसून येत आहेत. तेंव्हा एक खासदारकी सोडली तर लोकनेत्याच्या या दोन्ही लोकनेत्या कन्यांकडे सध्याला कोणतीच महत्त्वपूर्ण जबाबदारी नसल्याने यावेळी होणाऱ्या दसरा मेळाव्याला जरकरिता नेहमीपेक्षा जास्तीची अलोट गर्दी दिसून-आढळून आलीतर मात्र ते पंकजा-प्रितम मुंडे यांच्यावरील वैयक्तिक प्रेम-निष्ठा ठरेल. आणि मग राज्य-केंद्र भाजपाला पंकजा मुंडे यांचा विचार करावाच लागेल. अन्यथा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील मुंडे प्रेमींचा रोष आणि कार्यकर्त्यांचा जोश राज्य भाजपाचा होश उडवल्याशिवाय राहणार नाही आणि ते भारतीय जनता पार्टीला कदापि परवडणार नाही हे मात्र निश्चित. तेंव्हा आज पर्यंत दरवर्षीचा मेळावा हा दसरा मेळावाच होता. परंतु या वेळचा हा मेळावा केवळ नावाला दसरा मेळावा असून तो पंकजाताईंच्या बॅडपॅचचा घसारा मेळावा ठरणार असून या उद्याच्या मेळाव्याची गर्दी पंकजा मुंडेंची नेतेपणाची हिरावून घेतलेली वर्दी महाराष्ट्र भाजपाला नक्कीच परत करायला लावणार हेही एक शाश्वत सत्यच म्हटले तर वावगे ठरणार नाही....!! तेंव्हा उद्याचा दसरा मेळावा म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारणारा मेळावा ठरणार आहे. लोकनेत्या पंकजाची विस्कटलेली घडी उद्याच्या होणा-या दसरा मेळाव्याच्या गुढीने पुन्हा एकदा खडी होईल का....?? हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरेल......!!!!!.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून लाखोंचा गुटखा जप्त



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास हॉटेल किसान जवळ पळासनेर बाजुकडुन शिरपुर बाजुकडे येतांना दिसल्याने त्यास थांबण्याच्या ईशारा करुन सदर वाहन थांबवून आयशर वाहनावरील चालकास विचारपूस केले असता उडवा उडवी चे उत्तर दिल्याने ताबडतोब आईसर ताब्यात घेऊन पोलीस निरीक्षक कार्यालयास जमा केली. त्यात ते ३३, ९८,६४० रु किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला. परराज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेलागुटखा पानमसाल्याची विक्री करण्याच्या उद्येशाने तस्करी होत असल्याने पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील धुळे यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील स्थानिक गुन्हे शाखा , धुळे यांना सुचना देऊन कारवाई करणे बाबत आदेशीत केले होते. सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असतांना दिनांक ०४/१०/२०२२ रोजी पो.निरी. हेमंत पाटील , स्थागुशा धुळे यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की , आयशर वाहन यामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला रजनीगंधा सुंगधीत पानमसाला गुटख्याची वाहतुक होत असून सदर वाहन पळासनेर कडुन शिरपुर दिशेने येत असल्याची माहिती पो.निरी.स्थागुशा यांनी लागलीच पथकास सदर आयशर वाहनाचा शोध घेवून कारवाई करणे बाबत आदेशीत केले. सदर पथक आयशर वाहनांचा शोध घेत असतांना दहीबद गावाचे पुढे , सकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास हॉटेल किसान जवळ पळासनेर बाजुकडुन शिरपुर बाजुकडे येतांना दिसल्याने त्यास थांबण्याच्या ईशारा करुन सदर वाहन थांबवून आयशर वाहनावरील चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव १ ) शाकीर जाकीर खान वय २४ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर, रा. बामदा , तहसिल कसरावद , जिल्हा खरगोन मध्यप्रदेश व क्लिनरने त्याचे नाव २ ) शादाब हैदर खान वय २५ वर्ष व्यवसाय क्लिनर रा . बामदा , तहसिल कसरावद , जिल्हा खरगोन मध्यप्रदेश असे सांगितले . वाहन चालकास त्यांचे ताब्यातील आयशर बाहना मधील माला बाबत विचारपुस करता, त्यांनी उडवा - उडवीचे उत्तरे दिल्याने त्यांना आयशर वाहनासह पोलीस अधीक्षक धुळे कार्यालयाच्या आवारात आणले. सदर आयशर वाहनाची शासकीय पंचासमक्ष तपासणी करता त्यात खालील नमुण वर्णनाचा व किमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा मिळुन आला तो , १ ) १६.३२ , ९ ६० / - रु.किं.ची रजनीगंधा सुंगधीत पानमसाला ४ ) २,११,६८० / - रु.कि.ची तुलसी तंबाखु ५ ) ३,३६,००० / - रु.कि.ची मिराज सुपर तंबाखु ६ ) १०,००,००० / - / - रु.कि.चे आयशर वाहन क्रमांक असा एकुण ४३,९८,६४०/ - रु . किमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत पानमसाला तंबाखु विक्री करण्याच्या उद्येशाने वाहतुक करतांना मिळुन आल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग, धुळे यांचे मार्फत शिरपुर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे. सदरची कारवाई प्रविणकुमार पाटील, पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शना खाली स्था . गु . शा . चे पो . निरी. हेमंत पाटील , योगेश राऊत, बाळासाहेब सुर्यवंशी, अशोक पाटील, संदीप सरग, प्रकाश सोनार, कुणाल पानपाटील, उमेश पवार, रविकिरण राठोड, विशाल पाटील अशांनी केली आहे.

# प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांना आंतरराष्ट्रीय हवामान रक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** हवामान बदल व हवामान न्यायावर जगातील सर्व देश , सरकार, संस्था व नागरिकांनी इंटरनॅशनल ऑर्गनाइज़ेशन फ़ॉर एज्युकेशनल डेवलपमेंट (आयओइडी) या शिक्षण व उच्चशिक्षणाला वाहिलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेने आयोजिलेल्या हवामान बदल (क्लायमेट चेंज) व हवामान न्याय (क्लायमेट जस्टिस ) या विषयावरील आंतरराष्ट्रीय डीजीटल परिषदेचे उदघाटन माल्दवाचे माजी पंतप्रधान चीरील गाबुरीसी यांचे हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी आयओइडीचे संस्थापक कार्यकारी अध्यक्ष डॉ. अरविंद कुमार शर्मा हे होते. या हवामान न्याय या विषयावरील एक दिवसीय परिषदेच्या अंतीम सत्रात माजी कुलगुरू व माध्यमतज्ज्ञ प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांना इंटरनॅशनल ऑर्गनाइज़ेशन ऑफ़ एजुकेशनल डेवलपमेंट या संघटनेतर्फे आंतरराष्ट्रीय हवामान रक्षक (प्रोटेक्टर ऑफ़ क्लायमेट) हा पुरस्कार घोषित करण्यात आला. माल्दवाचे माजी पंतप्रधान चीरील गाबुरीसी यांनाही हा पुरस्कार दिला गेला. प्रा.डॉ. सुधीर गव्हाणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये परिसर विकास समितीचे अध्यक्षा नात्याने २०० हून अधिक एकर पडीक जमिनीवर जिरायत फळबाग प्रकल्प संकल्पना करून तो प्रत्यक्षात राबवून दाखविला आहे. हा प्रकल्प टान्फॉरमिंग वेस्ट लँड टू फ्रूट लँड म्हणून मानला जातो. यात सुमारे १५००० चिंच, आवळा, आंबा, सिताफळ, नारळ, चिकू फळझाडे यांची यशस्वी लागवड करून विद्यापीठात औरंगाबाद शहरासाठी विस्तारित ऑक्सीजन हब यशस्वीरित्या उभा केला गेला आहे. तत्कालीन कुलगुरू डॉ. शिवराज नाकाडे, प्रा. के. पी. सोनवणे, कृष्णा भोगे, प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी पाठबळ दिले. याशिवाय प्रा. सुधीर गव्हाणे यांनी पर्यावरण व हवामान बदल , रीसायकलींग उद्योग , ग्रीन टेक्नोलॉजी आदिंवर सातत्याने केलेल्या पोस्ट व लेखनाचीही नोंद केली गेली. प्रा. गव्हाणे यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टेनेबल डेवलपमेंट गोल्स व मिलेनियम डेवलपमेंट गोल्स , ग्लोबल ग्रीन ग्रोथ वर अनेक व्याख्याने दिलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या अभ्यासक्रमात पद्व्युत्तर स्तरावर भारतात प्रथमच शाश्वत विकास संवाद (सस्टेनेबल डेवलपमेंट कम्यूनिकेशन) व पर्यावरण संवाद ( एन्हायरमेंटल कम्यूनिकेशन) हे विषय सुरू केलेले होते तसेच सोलर प्लँटही व जलसंधारण योजना राबविली होती. या सर्व कार्याची नोंद घेऊन हा हवामान रक्षक पुरस्कार अंतरराष्ट्रीय शिक्षण विकास संघटनेतर्फे दिला गेला आहे.

# शनेश्वर मित्र मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** उदे ग अंबे उदे म्हणत घटस्थापनेला फागणे गावात नवरात्रोत्सवाला थाटात सुरुवात झाली. पावित्र्य, मांगल्य अन् उत्साहाचे प्रतीक असलेल्या नवदुर्गेची श्री शनेश्वर मित्र मंडळाच्या वतीने हर्षोल्हासात स्थापना करण्यात आली. दर सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री शनेश्वर मित्र मंडळाच्या नवदुर्गा चे आगमन झाल्याने भक्तांच्या आनंदाला उधाण आले होते. शनेश्वर मित्र मंडळाच्या वतीने नवदुर्गेच्या आरती मान योगेश बोरसे व दत्तात्रय पाटील या स्वपत्नीक जोडप्यांना देण्यात आले. आई जगदंबेच्या आरासाची रंगबिरंगी रोषणाईने सजावट करण्यात आले होते. तसेच रात्री गरबा, दांडिया अशा विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा आनंद महिला पुरुषांनी घेतला. तर श्री शनेश्वर मित्र मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रम व उपक्रमांसह भाविक भक्तांसाठी महाप्रसाद म्हणून भंडाऱ्याचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहितीही देण्यात आली.

# छायाचित्र स्पर्धेत स्वप्निलला द्वितीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** इनव्हॉलमेंट रिसर्च फॉंउंडेशन अँड एज्युकेशनल अॅकॅडमी अँड इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या स्तरावर छायाचित्रांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत स्वप्निलच्या छायाचित्रास सनराइज, सनसेट विषयात संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार प्राप्त छायाचित्रासह स्वप्निल कोर्टीकर दिसत आहे. स्वप्निल सध्या गरवारे कंपनीच्या औरंगाबादमधिल दोन्ही प्लँटचा डिव्हिजन जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत आहे.

# दारूबंदीसाठी अब्दुलापूरवाडी येथील ग्रामस्थ आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामंद**

**उमरी :** दारूबंदीसाठी आब्दुलापूरवाडी, ता. उमरी, जि. नांदेड येथील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. घरातला एक माणूस दारूचा गुलाम झाला की त्याच्या आसपासच्या किमान वीस जणांचे तरी जीवन नासते. त्रासाला, हिंसला आणि निर्दयतेला बळी पडते. त्याच्या शरीराचे नुकसान होते ते वेगळेच. डोक्यापासून पायापर्यंत आपल्या शरीराचा असा कोणताही अवयव नाही जिथे दारूचा विपरीत परिणाम होत नाही. मेंदूवर होणारे ताण तर महाभयंकर असतात. आठवण, वर्तमानाचे आणि भवतालचे भान, विवेकबुद्धी, समतोल ही मेंदूची महत्त्वाची कार्य मंदावतात.दारूमूळे तरूण पिढी उध्वस्त होत आहे. त्यामुळे आब्दुलापूरवाडी, ता. उमरी, जि. नांदेड येथील प्रतिष्ठित ग्रामस्थ गणेशराव संभाजी ताटे, राहुल दत्तराम वाघमारे,तिरुपती गणेशराव ढगे, बालाजी कृष्णाजी ढगे,मारोती रमेश पांडे, गोवर्धन अनिरुद्ध ढगे,मोहन रामजी खांदाखुळे, संतोष बालाजी ढगे, राजेश पवार आणि सर्व गावकरी मंडळी दारूबंदीची मागणी केली.






# गांधीजींचे चित्रपट हजार वर्षे जतन केले जातील

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गांधी फिल्म फाउंडेशनतर्फे पीआयक्यूएल टेक्नॉलॉजी नॉर्वेच्या सहकार्याने गांधीजींच्या जीवनावर आधारित चित्रपटांचे दीर्घकालीन जतन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने जतन केले जाणार आहे. गांधी फिल्म फाऊंडेशन आणि पीआयक्यूएल टेक्नॉलॉजी नॉर्वे यांनी गेल्या वर्षी यासंदर्भात अधिकृत घोषणा केली होती.

गांधी जयंतीनिमित्त गांधी फिल्म फाउंडेशनच्या कार्यालयात मणिभवन येथील एका विशेष कार्यक्रमात पीआयक्यूएल टेक्नॉलॉजी नॉर्वेचे प्रतिनिधि रमेश बजाज यांच्या हस्ते गांधी फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष नितीन पोद्दार यांच्या हस्ते दोन माहितीपट अधिकृतपणे वितरित करण्यात आले. यावेळी गांधी फिल्म फाउंडेशनचे श्री उज्ज्वल निरगुडकर विश्वस्त, सुभाष जयकर विश्वस्त, गांधी फिल्म फाऊंडेशन यांच्यासह इतर प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे हजार वर्षांहून अधिक काळ चित्रपटांचे जतन केले जाणार आहे. चित्रपटाच्या प्रिंट्सची दुसरी प्रत नॉर्वेमधील पीआयक्यूए च्या आर्क्टिक वर्ल्ड आर्काइव्ह मध्ये शून्य तापमानात साठवली जाईल. उज्ज्वल निरगुडकर यांनी या योजनेची सुरुवात केली आणि श्री. सुभाष जयकर यांनी गांधींच्या जीवनावर आधारित दोन चित्रपट जतन करण्यासाठी निवडले. रवीश मेहरा, पीआयक्यूएल , इंडिया यांनी या योजनेचे नॉर्वेशी समन्वय साधले. गांधींच्या जीवनाशी संबंधित पहिले दोन चित्रपट जतन केले गेले आहेत, पहिला 14 मिनिटांचा डॉक्युमेंटरी फिल्म राउंड टेबल कॉन्फरन्स, लंडन (1930-1932) लंडनमधील गोलमेज परिषद, तसेच गांधींच्या स्वित्झर्लंड आणि इटलीच्या भेटींवर आहे. 12 मार्च 1930 रोजी गुजरातमधील नौखली येथे झालेल्या मिठाच्या आंदोलनाविषयीचा 11 मिनिटांचा दांडी मार्च हा दुसरा चित्रपट आहे.

गांधी फिल्म्स फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन पोद्दार म्हणाले की, गांधीजींच्या चित्रपटांमध्ये मौल्यवान शिकवणी आहेत जी आपल्या भावी पिढ्यांसाठी जतन करणे आवश्यक आहे आणि जर आपण तसे केले नाही तर मला वाटते की आपण आपल्या देशाची मोठी संपत्ती असू. त्याच्या कर्तव्यात.

या प्रसंगी बोलतांना, पीआयक्यूएल , नॉर्वेचे व्यवस्थापकीय संचालक रुने बजार्केस्ट्रँड म्हणतात, चित्रपटांद्वारे भविष्यासाठी सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी महात्मा गांधींचे हे प्रतिष्ठित दृकश्राव्य जतन करताना आनंद होत आहे. उज्ज्वल निरगुडकर ट्रस्टी, गांधी फिल्म फाउंडेशन यांनी सांगितले की, दीर्घकालीन जतन करण्यासाठी पीआयक्यूएलच्या अद्वितीय तंत्रज्ञानाद्वारे स्कॅन केलेल्या 35mm चित्रपटांचा डिजिटल ऑडिओ-व्हिज्युअल डेटा जतन करण्याचा हा भारतातील पहिलाच प्रयत्न आहे.

# सेवा पंधरवड्यात महावितरणने दिल्या ५८ हजारांवर नवीन जोडण्या

## राज्य शासनाचा उपक्रम यशस्वीपणे राबविला

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवाड्यात महावितरणने विशेष कामगिरी बजावत केवळ १५ दिवसांत ५८ हजार ४५७ घरगुती ग्राहकांना नवीन वीजजोडण्या दिल्या आहेत. याशिवाय प्रलंबित असलेल्या ४४ हजार ६६९ ग्राहकांच्या वीजबिलावरील नावात बदल करण्याचे सर्व अर्ज या पंधरवाड्यात निकाली काढत राज्य शासनाच्या या उपक्रमाचे महावितरणने १०० टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ या पंधरवड्यात ग्राहकांच्या प्रलंबित असलेल्या विशेषतः नवीन वीजजोडणी व ग्राहकांच्या वीजबिलावरील नावात बदल करणे या प्रकारच्या तक्रारींचे निवारण या पंधरवड्यात करण्यात यावे, असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिले होते. महावितरणने नवीन वीजजोडणीसोबतच ग्राहकांच्या वीजबिलावरील नावात बदल करण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नवीन ग्राहकांना वीजजोडणीसाठी रहिवाशी असल्याच्या एखाद्या दाखल्यासोबत सुरक्षा ठेव रक्कम भरावी लागते. तसेच वीजबिलावरील नावात बदल करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

क्षेत्रीय स्तरावर १० सप्टेंबर २०२२ पर्यंत पैशाचा भरणा करून प्रलंबित असलेल्या ५८ हजार ४५७ नवीन घरगुती वीजजोडणीच्या अर्जावर त्वरित कार्यवाही करून सेवा पंधरवड्यात सर्व ग्राहकांना नवीन वीजजोडण्या देऊन महावितरणने १०० टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. यात औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयांतर्गत ९ हजार ५२८, कोकण प्रादेशिक कार्यालयांतर्गत २५ हजार ६८५, नागपूर प्रादेशिक कार्यालयांतर्गत १४ हजार ९७५ आणि पुणे प्रादेशिक कार्यालयांतर्गत ९ हजार ६७३ नवीन घरगुती वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.

याशिवाय ग्राहकांच्या वीजबिलावरील नावात बदल करण्यासाठी ४४ हजार ६६९ ग्राहकांचे अर्ज वैध ठरविण्यात आले असून या सर्व ग्राहकांच्या नावात बदल करण्यात आले आहेत. औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयांतर्गत ३ हजार २८५, कोकण प्रादेशिक कार्यालयांतर्गत २० हजार २८३, नागपूर प्रादेशिक कार्यालयांतर्गत ६ हजार ३०० आणि पुणे प्रादेशिक कार्यालयांतर्गत १४ हजार ८०१ ग्राहकांचा समावेश आहे.

# राशन दुकानदारांच्या विरोधात तहसीलसमोर मनसेचे ढोल बजाओ आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील राशन दुकानदारांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी मनसेचे कन्नड तहसीलदार कार्यालया समोर ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले असुन नियमानुसार प्रत्येक स्वस्त धान्य दुकान धारकास स्टॉक, सेल, राशन दुकान उघडण्याचे वेळ भावफलक दर्शवने अनिवार्य आहेत. सध्या तालुक्यात दुकानदारांचा मनमानी कारभार चालू असल्याने मनसे पदाधिकारी यांनी नायब तहसीलदार दिनेश राजपूत यांना निवेदन देण्यात आले या दुकानदारांन वर कारवाई होणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हा. उपाध्यक्ष डॉ.बाबासाहेब थेटे, तालुका अध्यक्ष विकास बागुल, तालुका सचिव गोपालसिंग राजपूत, तालुका उपाध्यक्ष संतोष खेळवणे, तालुका उपाध्यक्ष राहुल निकम, शहर अध्यक्ष शशांक महादाणे, शहर सचिव शैलेश राऊत, शहर उपाध्यक्ष अमर राठोड यांची उपस्थिती होती.




# मुंडवाडीतील दोन बचत गटांना अठरा लाखांचे कर्जवाटप

## महिला स्वयं सहायता समुहांना आता स्वावलंबनासाठी हातभार लागणाऱ : रामेश्वर मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मुंडवाडी येथिल जगदंबा महिला स्वयं सहायता समुह व गणेश म.स्व.स.समुह यांना दुग्धव्यवसाय व सर्व प्रकारचे रेडिमेड पॅकींग पिठ या उपजिवीकांच्या उपक्रमासाठी अनुक्रमे दहा लाख तसेच आठ लाख असे एकुण १८ लक्ष रुपये बँक ऑफ महाराष्ट्र कालीमठ उपळा तर्फे कर्ज मंजुर व वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांनी व्यावसायीक प्रगती करुन त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत स्वयं समुहांसाठी विविध योजना राबविल्या जातात. यातच भर घालत आता महिला स्वयं सहायता समुहांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विनातारण विस लाख रुपयापर्यंतचे कर्ज देण्याचा निर्णय केंद्रशासनाने घेतला आहे.

त्या अनुषंगाने उमेद अभियानांतर्गत नागद प्रभागातील मुंडवाडी येथील जगदंबा समुहाला दहा लाख व गणेश समुहाला आठ लाख रुपये बँक ऑफ महाराष्ट्र, कालीमठ



उपळा शाखेने दुग्धव्यवसाय व रेडिमेड पिठ पॅकींग उद्योगासाठी कर्ज मंजुर करुन ते वितरीत करण्यात आले. कर्ज मंजुरीसाठी रामेश्वर मोरे यांनी सतत पाठपुरावा करुन सदरील समुहांना कर्ज मंजुर करुन दिले. एखाद्या बचत गटाला दहा लाख मंजुरीचे हे पहिलेच उदाहरण ठरले. भविष्यातही इतर बचत गटांना देखील उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज उभारणीसाठी प्रयत्न करुन कर्ज मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे रामेश्वर मोरे यांनी सांगीतले. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा व्यवस्थापक व्यंकटेश काथार, रामेश्वर मोरे, चित्रा मगर, उज्वला तायडे, सिद्धार्थ नरवडे ,ग्रामसंघ लिपिका संगिता तायडे शैला दांडगे, महेश्वरी दांडगे, अलकाबाई गुंजाळ, लताबाई शिंदे, छाया शिंदे, अरुणबाई गुंजाळ, सविता जाधव, सविता दांडगे सह दोन्ही समुहातील महिला उपस्थित होत्या.

# नायगावात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

## 1 लाख 71 हजार रोख रकमेसह 5 लाख 24 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वामननगर येथील एका शेतामध्ये जुगार अड्डा सुरू असल्याची गुप्त माहिती बिलोलीचे सहाय्यक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वामननगर येथील शेतामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्यावर धाड टाकली.यावेळी जुगार खेळणाऱ्या आठ जुगाऱ्यांना गजाआड करून त्यांच्याकडून 1 लाख 71 हजार 500 रुपये रोख रक्कमेसह 5 लाख 24 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बिलोलीचे सहाय्यक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्यांनी नायगावचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, पोलीस उपनिरीक्षक बाचावार, पोलीस अंमलदार वाघमारे, मुस्तापुरे, देगलूरकर, वळगे, गंदपवाड, तमलुरे, देवकत्ते, क्षीरसागर, चालक झेलेवाड आणि अंगरक्षक आचेवाड यांच्यासोबत छापा टाकला. त्यावेळी पोलीस निरीक्षक शिंदे, पोलीस उपनिरीक्षक वाघमारे, मुस्तापुरे, देगलूरकर, गंदपवाड, कमलुरे यांनी शेताच्या पश्चिम बाजूने आणि पोलीस उपनिरीक्षक बाचावार, आचेवाड, क्षीरसागर, देवकत्ते, भोळे आदींनी दक्षिण बाजूने शेत गाठले. 3 ऑक्टोबरच्या मध्यरात्री 1.30 वाजता हा छापा टाकण्यात आला. तेथे शेख जावेद सरदार, रा. विठ्ठलनगर नायगाव, शिवाजी जाधव, रा.कृष्णूर, बालाजी गुडमलवार, रा. मुखेड, शिवाजी पाटील, रा. मुखेड, पिराजी काळमिरे, रा.सालेगाव, ता. नायगाव, सोमनाथ बेलके, रा. नायगाव, हनमंत बोईनवाड, रा. बेळगेनगर नायगाव आणि राजेश सुकने, रा. जुने नायगाव अशा 8 जणांना पकडले. त्यांच्याकडून 1 लाख 71 हजार 500 रुपये रोख रक्कम, सहा मोबाईल, किंमत 41 हजार रुपये आणि 7 दुचाकी गाड्या किंमत 3 लाख 12 हजार रुपये असा एकूण 5 लाख 24 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 144 / 2022 मुंबई जुगार कायदा कलम 12(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार मुस्तापुरे हे करत आहेत.

# डोळ्यात तिखट टाकून पैसे लुटणारे पाच आरोपी अटकेत

## गुन्हयात वापरलेल्या दोन मोटारसायकली व चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** पोलीस स्टेशन बिडकीन हद्दीतील शेकटा व बिडकीन रोडवर विहामांडवा येथील टेम्पोचालक गोपाल निकम व त्याचा सहकारी दत्ता कोरडे हे जितू पहाडे यांचे विराज अॅग्रोटेक मिल मधुन १०० कट्टे शेंगदाणे घेवून सटाणा जि.नाशिक येथील लक्ष्मी ऑईल मील येथे पोहोच करून त्याचे ५,५८,०००/- रुपये लक्ष्मी ऑईल मिल यांचेकडून घेवून टाटा टेम्पो क्र. एमएच १६ सी सी १०९४ ने परत येत असतांना शेकटा ते बिडकीन जाणारे रोडवर गिधाडा शिवारात हॉटेल माउली समोर असताना आमच्या पाठीमागुन एका मोटार सायकलवरुन अनोळखी तीचे जण येवून गाडी अडवून डोळयात मिरची पावडर टाकुन ड्रायव्हर सिटचे पाठीमागे ठेवलेले ५,५८,०००/- रुपये घेवून गेले वरून गुरनं ४६७/२०२२ कलम ३९२.३४ भादंवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादी नामे गोपाल भगवान निकम व फिर्यादी सोबत असलेले दत्ता दत्ता बाबुराव कोरडे यांना विश्वासात घेवून विचारपुस केली तसेच घटनास्थळावरील हजर असलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना विचारपुस करण्यात आली. तसेच गोपाल भगवान निकम यांचे मोबाईलचे सीडीआर तसेच इतर आरोपीचे सीडीआर वरून १) गोपाल भगवान निकम वय १९ वर्षे रा. विहामांडवा ता. पैठण जि. औरंगाबाद, २) दत्ता बाबुराव कोरडे वय २१ वर्षे, ३) ज्ञानेश्वर गणेश कोलते २२ वर्षे रा. रोशनगांव ता. बदनापुर जि. जालना, ४) देवसिंग निहालसिंल दुल्लत वय २१ वर्षे रा. परदेशवाडी कंडारी खु ता. बदनापुर जि. जालना, ५) बाळु ज्ञानेश्वर अंभोरे वय २० वर्षे रा. कस्तुरवाडी ता. बदनापुर जि. जालना यांचा सहभाग निष्पण झाल्याने त्यांना गुन्हयात अटक करण्यात आली. सदर आरोपींना मा. न्यायालय पैठण येथे हजर केले असता त्यांचा दि.०६/१०/२०२२ रोजी पर्यंत PCR मंजूर करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयात चोरीस गेलेली रक्कम पैकी ४,५०,०००/- रुपये व गुन्हयात वापरलेले १) बजाज प्लॅटीना कंपनीची मोटार सायकल MH २१ BR ३५४९, २) बजाज प्लसर मोटार सायकल क्र. MH २१ BJ ४४९४ हे जप्त करण्यात आले असून इतर आरोपीचा शोध सुरु आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक पवन बनसोड साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल नेहूल साहेब व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी गंगापुर प्रकाश बेले साहेब, पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा (LCB) पोनि यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. संतोष माने, पोउपनि महेश घुगे, पोना / ११५० शरद पवार, पोकों / १२६८ एच. एन धनवे, पोना/७६१ अमोल मगर पोकों/ संदिप धनेधर,पोना नाडे तसेच स्थानिक गुन्हे शाखा औरंगाबाद ग्रामीण येथील पथक पोउपनि विजय जाधव, पोहेकॉ संतोष पाटील तसेच सायबर पथकचे अंमलदार योगेश तरमले व जिवन भोलप यांनी केली. सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहूल साहेब व सपोनि संतोष माने यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश घुगे हे करीत आहेत.



# सततच्या पावसाने शेतीचे नुकसान; बळीराजा अजूनही मदतीच्या प्रतीक्षेत

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** मागील काही दिवसांत भरपूर पाउस झाला, मात्र शासनाची नुकसान भरपाई अजूनही शेतकऱ्यांना मिळाली नाही. शासनाने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा आघाडी सरकारने दोन वर्षापूर्वी केली होती. सत्तेच्या सारीपाटात संगीत खुर्चीच्या राजकारणात आजपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान मिळाले नाही. त्या संदर्भातील काही ठिकाणी अर्जही भरले. परंतु पुढे काही झालेच नाही. त्यातच सतत पडत असणारा पाऊस आणि न मिळालेले अनुदान यामुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी संकटात आला आहे. कोरोनाच्या काळात दोन वर्षे शेतकऱ्यांना शेतीतून अपेक्षेप्रमाणे वार्षिक आर्थिक उत्पन्न मिळाले नाही. तसेच यावर्षी सततच्या जोरदार पावसाने शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले. ओला दुष्काळ सदृश परिस्थिती तालुक्यात निर्माण झाली. तरी देखील शासनाने ओला दुष्काळ जाहीर केला नाही. या वर्षी शेतीला लागलेले भांडवलही वसूल होणार का नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत.सोयगाव तालुक्याच्या भागातील देव्हारी व डाभा, सावळदबारा, नंदा तांडा, घाणेगाव तांडा, टिटवी, आणि नदीकाठावरील हा परिसर अतिवृष्टी ग्रस्त दिसतो. यावर्षी या भागातील शेतकऱ्यांना शेतातून कवडीही उत्पन्न मिळेल का नाही अशी अवस्था आहे.सोयगाव तालुक्यात अनेक दिग्गज नेते मंडळी सुद्धा येऊन गेली, घोषनेचा पाऊस पाडुन गेले, पण नुकसान भरपाईचा पताच नाही, या वर्षी पावसाने शेतीचे व पिकांचे मोठे नुकसान झाले. शासनाने जबाबदारी पार पाडली व पंचनामे करुन भरपाई दिली जाईल, असे सांगितले. तसेच ज्या शेतकऱ्यांचे पंचनामे राहिले आहेत, त्यांचे पंचनामे करावेत किंवा सरसकट नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी सोयगाव तालुक्यातील शेतकरी करीत आहे.

# गौण खनिजाचे अवैध उत्खनन; महसूलकडून जेसीबी, ट्रॅक्टर जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यात सध्या अवैध गौण खनिजाचा मुद्दा चांगलाच रंगत धरू लागला असुन विविध प्रसार माध्यमातुन बातम्या ही प्रसिध्द होत आहे म्हणूनच महसुल प्रशासनाने जेसीबी, ट्रॅक्टरवर कारवाई केली आहेत. रिठ्ठी गावच्या शिवारात परवानगी न घेता जेसीबीव्दारे मुरूम उत्खनन करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक होत होती. महसूल विभागाला माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सतीश भदाने, तलाठी आशिष सुरपम जेसीबी, ट्रॅक्टर जप्त करून पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालयात जमा केले.

# आश्रम शाळेत वन सप्ताह साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** सावळदबारा परिमंडळ अंतर्गत मौजे घाणेगाव तांडा येथील आश्रम शाळेत वन सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितीत सरपंच रत्नाताई चव्हाण, मुख्याध्यापक संजय पाटील, कवीश्वर एस. पी., बागुल डी. झेड. सर, चौधरी सर, पायघन एस. डी, कामाटी, आरभाई डी.बी. सर, मुख्याध्यापक पी. टी. आहेर सर, लवांडे डी. एम., चव्हाण बी.सी., व परिमंडळातील सर्व वनरक्षक वनमजूर उपस्थित होते. यावेळी चित्ता इंट्रोडक्शन, झाडे लावा झाडे जगवा, वन्यप्राणी संरक्षण, संवर्धन, मानव वन्यजीव संघर्ष याबाबत मार्गदर्शन केले. वन्यप्राणी जीवावर केवळ माणसाने आपला हक्क स्वार्थापोटी गाजविणे चुकीचे असून जीवसृष्टीचा देखील विचार करायला हवा, वन्यजीव जगविले तर मानव निसर्गाच्या प्रकोपापासून सुरक्षित राहू शकेल, असा सूर वन्यजीव सप्ताह शुभारंभाच्या निमत्ताने कर्मचाऱ्यांनी विद्यर्थ्यांमध्ये उमटला.

# डाभा येथे लम्पीचा पहिला बळी, लसीकरण सुरू; शेतकरी मात्र चिंतित

## शेतकरी संतोष दांडगे यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये सावळदबारा परिसरात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने लसीकरण मोहीम राबविली जात असली तरी लम्पी स्किन आजाराचा धोका अजूनही टळला नसल्याचे दिसत आहे. शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसत आहे. फर्दापूर सर्कलमधील सावळदबारा पशुवैद्यकीय केंद्रा अंतर्गत येणाऱ्या परिसरात आतापर्यंत नेमक्या किती गुरांना लम्पी स्किन आजाराची लागण झाली आहे.सर्कलमधील सावळदबारा पशुवैद्यकीय केंद्रा अंतर्गत येणाऱ्या डाभा गावात लम्पी स्किन आजाराने पहिला बळी घेतला आहे. शेतकरी बाळू संतोष दांडगे डाभा ता सोयगाव यांचा बैल लम्पी स्किन आजारामुळे दगावला यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या हस्ते पंचनामा करण्यात आला. यावेळी सरपंच राहूल हेलोडे, उपसरपंच सुनील दांडगे, रामेश्वर दांडगे, गोपाळ दांडगे, रविंद्र दांडगे, राहूल दांडगे, आकाश दांडगे, धोंडू गरुड, किसन जाधव, गणेश ठोके,ईश्वर शेळके(शाखा अध्यक्ष),व ग्रामस्थ उपस्थित होते.बाळू दांडगे याचां बैल दगावल्याने शेतकरी व पशुपालक यांच्या मधे चिंतेचे वातावरण तयार झाले आहे. याबाबत अधिकृत आकडेवारी उपलब्ध झाली नसली तरी रविवारी रात्री बाळू दांडगे यांच्या बैलाचा लम्पी स्किन आजाराने मृत्यू झाल्याची घटना सकाळी दि.३/१०/२२ सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वेगाने लसीकरण मोहीम परिसरात चालू आहे. पशुपालक यांनी घाबरून जाऊ नये असे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. जी.एस.लांडगे यांनी सांगितले. गुरांना लम्पी स्क्रीन आजाराची लागण झाली असून बाधित गुरांवर तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ विनोदकुमार चव्हाण वैद्यकीय उपचार करत आहे.तरी शेतकरी बाळू संतोष दांडगे याचां एक बैल गेल्याने ते हतबल झाले त्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे सहसचिव विठ्ठल दांडगे यांनी केली आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in